विषय... प्रवास
सं. क्र 802

# मनोहर महाराष्ट्र

लेखक

**होमी जे. एच्. तल्यारखान**

सार्वजनिक आरोग्य, अल्पबचत व
पर्यटन खात्याचे मंत्री, महाराष्ट्र राज्य

**किंमत : रु. १·००**

REFBK-0028818

महाराष्ट्र राज्य पर्यटन खातें प्रकाशन

प्रथम मुद्रण :
जुलै १९६१

प्रकाशन संचालक, महाराष्ट्र सरकार, मुंबई

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १ | महाबळेश्वर | १ |
| २ | माथेरान | ५ |
| ३ | कार्ला | ७ |
| ४ | भंडारदरा | ११ |
| ५ | पन्हाळा | १५ |
| ६ | तोरणमाळ | १९ |
| ७ | चिखलदरा | २४ |
| ८ | महिषमाळ | २९ |
| ९ | आंबोली | ३१ |
| १० | जव्हार | ३५ |
| ११ | राधानगरी | ३७ |
| १२ | मुरुड | ३८ |
| १३ | भीमाशंकर | ४० |
| १४ | हेळवाक | ४३ |
| १५ | रत्नागिरी-कोंकणची राणी | ४५ |
| १६ | राजापूर | ४९ |
| १७ | अजण्ठा येथील कोरीव लेणीं | ५१ |
| १८ | औरंगाबाद | ५४ |
| १९ | वेरुळचीं लेणीं | ५७ |
| २० | किल्ले दौलताबाद | ६२ |
| २१ | किल्ले शिवनेरी | ६४ |
| २२ | वज्रेश्वरी | ७२ |
| २३ | पांचगणी | ७४ |

# छायाचित्रें


| | |
|---|---|
| महाबळेश्वर येथील विश्रामधामें | ३ |
| महाबळेश्वर येथील विश्रामधामें | ४ |
| कार्ला येथील विश्रामधामें ( १ ) | ९ |
| कार्ला येथील विश्रामधामें ( २ ) | १० |
| भंडारदरा येथील विल्सन डॅम | १३ |
| पन्हाळ्याच्या परिसरांतील १२०० वर्षांपूर्वींचें जोतिबाचें मंदिर | १६ |
| सज्जा कोठी, किल्ले पन्हाळा | १६ |
| रंधा धबधबा | १७ |
| तोरणमाळ येथील सिताखिंड | २१ |
| तोरणमाळ सरोवराचे किनाऱ्यावरील आदिवासी नृत्य | २२ |
| चिखलदरा येथील विश्रामधामें ( १ ) | २५ |
| चिखलदरा येथील विश्रामधामें ( २ ) | २६ |
| सरकारी बंगल्यांतून दिसणारा देखावा — महिषमाळ | २९ |
| आंबोलीचा डोंगर — रत्नागिरी जिल्हा | ३३ |
| आंबोलीपासून ३५ मैलांवर असणारा वेंगुर्ल्याचा समुद्रकिनारा | ३४ |
| भारतांतील १२ ज्योतिर्लिंगांपैकीं एक ज्योतिर्लिंग— भीमाशंकराचें मंदिर | ४२ |
| भीमाशंकराच्या टेकडीवरून दिसणारा देखावा | ४२ |
| किल्ले रत्नागिरी | ४६ |
| चिपळूणजवळील परशुराम मंदिरांतून दिसणारा देखावा | ४८ |
| राजापूरची गंगा | ५० |
| वेरुळचें कैलास मंदिर | ५९ |
| श्रीशिवाजी महाराजांचें जन्मस्थान—शिवनेरीवरील नव्यानें बांधलेली वास्तु | ६७ |
| शिवनेरीवरील उडत्या कमानीची मशीद | ६९ |

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
भूप्रवास
९०२
वा. क्र. २८८१८
३१।३।९८
संदर्भ शाखा

977
संदर्भ
९०२
भूप्रवास
२८८१८
३१।३।९८

# मनोहर महाराष्ट्र

REFBK-0028818
REFBK-0028818

१

# महाबळेश्वर

महाबळेश्वरला जाऊन आलेल्याच्या तोंडीं "जन्माला यावें आणि एकदां तरी महाबळेश्वरला जावें" असे उद्गार बाहेर पडतात, याचें कारण काय? सुटीच्या दिवशीं महाबळेश्वरला भेट दिल्याशिवाय यांतील वर्म समजणार नाहीं इतकें सर्वांगसुंदर ठिकाण, महाबळेश्वर हें आहे.

सातारा जिल्ह्यांत पुण्यापासून ७७ मैलांवर समुद्रसपाटीपासून ५००० फूट उंचीच्या पहाडांवर महाबळेश्वर हें स्थान वसलेलें आहे. सर्व डोंगरी ठिकाणांची राणी असें महाबळेश्वरला संबोधण्यांत येतें. येथील थंड हवेंत व शांत वातावरणांत सुटीचे दिवस मोठ्या आनंदांत घालवितां येतात.

दमल्याभागलेल्या उद्योगी लोकांसाठीं, खास सरकारी देखरेखीखालीं एक भव्य इमारत खुली करण्यांत आली आहे. कांहीं वर्षांपूर्वीं महाबळेश्वर ही उन्हाळी राजधानी समजण्यांत येई, त्यावेळीं या इमारतींत सरकारी मुक्काम असे. आज या स्थळीं २५० लोकांची रहाण्याची सोय करण्यांत आली आहे.

पुण्याच्या एक्झिक्युटिव्ह इंजिनियरकडून बरेच दिवस आगावू, या ठिकाणीं रहाण्याची व्यवस्था मुक्रर करावी लागते. सर्व सुखसोयींनीं सज्ज असें हें ठिकाण आहे. याच्या आसपास प्रशस्त आवार आहे, विस्तृत क्रीडांगण आहे, मुलांबाळांना हुंदडायला व खेळायला मोठें थोरलें पटांगण आहे.

नयनरम्य वनश्री, मोक्याच्या ठिकाणावरून दिसणारे सुरम्य देखावे, सहलीसाठीं पायवाटा, वाहनांतून रपेट मारण्यासाठीं सडक रस्ते पाहिले कीं मन उत्साहानें हुरळून जातें. महाबळेश्वरीं प्रवेश करतांच आपलें हार्दिक स्वागत करण्यास, एक प्रशांत सुंदर सरोवर, इमानी द्वाररक्षकाप्रमाणें जणू उत्सुक असतें !

महाबळेश्वरीं स्वच्छ उपहारगृहें व क्लब्स आहेत; भाविकांचें श्रद्धास्थान, महाबळेश्वराचें पुराणें मंदीर आहे. इतिहासाचा मौलिक अलंकार, किल्ले प्रतापगडाचें स्फूर्तिदायक दर्शन, महाबळेश्वराहून घडतें. याच किल्ल्यांत श्रीछत्रपति शिवाजीमहाराज आणि अफ-जुलखान यांचें द्वंद्वयुद्ध झालें.

महाबळेश्वरीं मोटर गाड्यांना मज्जाव नसला तरी त्यांची वर्दळ मर्यादित करण्यांत आली आहे; उद्देश एवढाच कीं, तिकडील रहिवाशांना धुरळ्याचा उपद्रव कमींत कमी व्हावा.


महाबळेश्वरच्या जवळांत जवळील रेल्वे स्टेशन पुणें हें होय. पुण्याहून सुरेख रस्त्यानें सर्व सुखसोईंनीं सुसज्ज व अलिशान अशा स्टेट ट्रॅन्स्पोर्ट बसनें, पंचगणीवरून महाबळेश्वरला जातां येतें. महाबळेश्वरच्या आधीं पंचगणी हें महाबळेश्वरपासून अवघ्या बारा मैलांवर आहे.

पंचगणी हें ठिकाण आरोग्यधाम म्हणून सुप्रसिद्ध आहे. प्रदीर्घ दुखण्यांतून उठलेल्यांसाठीं आणि मुलांसाठीं येथील हवामान आरोग्यदायी असल्याची ख्याती आहे. पंचागणीला मुलांसाठीं दहा शाळा स्थापण्यांत आल्या आहेत.

पंचगणी हें ठिकाण महाबळेश्वरखालीं ५०० फूट सखल असलें तरी तेथील पावसाचें प्रमाण अवघें ६५ इंच आहे, तेंच महाबळेश्वरचें पर्जन्यमान २०० इंच आहे. यामुळें पंचगणी, बारमाही खुलें असतें आणि या ठिकाणीं चिरस्थायी रहाणारीं बिऱ्हाडें आहेत.



महाबळेश्वर येथील विश्रामधामें



[illegible] कॅंपमधील रमणीय कक्षा

मराठी ... भूप्रवास २०२ दा. क्र. २११२९८ ३।७।५५ संग्रह शाखा (स्थळ प्रत)

२

○

○

# माथेरान

○

○

○ ○ ○ ○ ○ ○ ○ ○

माथेरान हें समुद्रसपाटीपासून २२०० फूट उंचीवर आहे. हें डोंगरी ठिकाण कुलाबा जिल्ह्यांत असून मुंबईहून रेल्वेमार्गानें ५२ मैलांवर वसलेलें आहे. नयनरम्य वनश्रींतून जाणाऱ्या रेल्वे-रस्त्यानें तें नेरळहून १३ मैल अंतरावर आहे. आडवाटेनें गेल्यास नेरळ हें रेल्वेस्टेशन, फक्त ७ मैलांवर आहे.

ह्या चिमुकल्या पण अत्यंत लोकादरास पात्र ठरलेल्या डोंगरी ठिकाणीं, सरकारतर्फे पहिलेंच सुटीचें शिबीर किंवा हॉलिडे कँप, सुखसोयींनीं सुसज्ज असें सुरू करण्यांत आलें आहे. अल्पवेतन मिळविणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठीं हें खास खुलें ठेवण्यांत आलें आहे.

माथेरानच्या मोक्याच्या ठिकाणांहून अत्यंत नयनमनोहर व रम्य देखावे दिसतात. त्याच प्रमाणें येथील गर्द झाडझाडोऱ्यामुळें माथेरानचें वातावरण अत्यंत शीतल व व प्रशांत असें आहे.

माथेरान ह्या रेल्वे स्टेशनपासून दोन मैलांवर प्रशस्त जागीं मलंग बंगला नांवाची एक इमारत आहे. ही इमारत श्री. जे. पी. सी. श्रॉफ या दानशूर गृहस्थानें देणगी-दाखल दिली. या इमारतीच्या आसपास नयनरम्य असे देखावे असून येथील विपुल झाडझाडोऱ्यामुळें येथील हवामान अत्यंत थंड व श्रांत मनाला उत्साह देणारें आहे.

नेरळहून माथेरानला येणारी आगगाडी अमान लॉजच्या जवळ उभी रहावी अशी व्यवस्था मुद्दाम करण्यांत येत आहे. सरकारी सुटीच्या शिबिरापासून हें नवें रेल्वे स्टेशन दृष्टीच्या टप्प्यांत असण्याइतकें नजीक आहे.

ह्या सुटीच्या कॅंपमध्यें किंवा शिबिरामध्यें १० कुटुंबें सुखांत राहूं शकतील अशी व्यवस्था आहे. स्नानगृहांत पाण्याच्या फवाऱ्याचीही व्यवस्था करण्यांत आली आहे. एक कुटुंबाला दरदिनी १॥ पासून २ रुपये पर्यंत भाडें म्हणून आकार द्यावा लागतो.

रेल्वे कॉंट्रॅक्टरकडून खाण्याजेवण्याची व्यवस्था करण्यांत आली आहे. या शिबिरांत लौकरच वीजबत्तीचीही सोय होणार आहे. माथेरानला अनेक उपाहार गृहें व रहाण्याच्या सोयी आहेत, पण सरकारतर्फे जी ही व्यवस्था झाली आहे तें एक प्रकारचें पहिलेंच धाडस असून इतक्या स्वस्त दरांत इतर कोणालाही अशी खाद्यपेयाची व्यवस्था करता आलेली नाहीं.

# ३

# ०

# ०

# कालें

# ०

# ०

# ० ० ० ० ० ० ० ०

कालें हें डोंगरी ठिकाण समुद्रसपाटीपासून २७०० फूट उंचीवर आहे. सन्मान्य श्री. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्राचे आजि मुख्य मंत्री यांनीं १९५७ च्या नोव्हेंबर महिन्यांत, कालें येथील पहिल्या सुटी–शिबिराचें उद्घाटण केलें !

लोणावळ्यापासून अवघ्या ५ मैलांवर हें शिबीर आहे. नयनरम्य वनश्रीच्या मध्यभागीं हें शिबीर वसविण्यांत आलें आहे; येथें अनेक पर्णकुट्या बांधण्यांत आल्या असून अल्पवेतन मिळविणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या कुटुंबांसाठीं दरदिनी ३ रुपये भाड्यानें स्वतंत्र पर्णकुटी मिळूं शकते.

लोणावळें आणि खंडाळा ह्या डोंगरी ठिकाणीं उष्णतामान जरी वाढलें तरी या कार्ल्याच्या सुटीच्या शिबिराच्या आसपास गर्द झाडेंझुडपें असल्यामुळें येथील हवामान अत्यंत थंड व उत्साहवर्धक असतें !

आधुनिक सुखसोयींनीं सुसज्ज असेंच हें शिबीर आहे. इथें नाहीं असें कांहींच नाहीं. वीजबत्ती आहे, टेलिफोनची सोय आहे, मुलांबाळांसाठीं विस्तृत क्रीडांगणें आहेत. या शिबिरापासून एकाच मैलाच्या अंतरावर मळवली हें रेल्वे-स्टेशन आहे.

मळवली या स्टेशनावर वेळच्यावेळीं आगगाड्यांची ये–जा चालू असते. मळवली रेल्वे-स्टेशन आणि कार्ल्यांचें सुटीचें शिबिर यांतील अंतर जरी ८ फर्लांगांचें असलें तरी

नेरळहून माथेरानला येणारी आगगाडी अमान लॉजच्या जवळ उभी रहावी अशी व्यवस्था मुद्दाम करण्यांत येत आहे. सरकारी सुटीच्या शिबिरापासून हें नवें रेल्वे स्टेशन दृष्टीच्या टप्प्यांत असण्याइतकें नजीक आहे.

ह्या सुटीच्या कँपमध्यें किंवा शिबिरामध्यें १० कुटुंबें सुखांत राहूं शकतील अशी व्यवस्था आहे. स्नानगृहांत पाण्याच्या फवाऱ्याचीही व्यवस्था करण्यांत आली आहे. एका कुटुंबाला दरदिनी १॥ पासून २ रुपये पर्यंत भाडें म्हणून आकार द्यावा लागतो.

रेल्वे कॉंट्रॅक्टरकडून खाण्याजेवण्याची व्यवस्था करण्यांत आली आहे. या शिबिरांत लौकरच वीजबत्तीचीही सोय होणार आहे. माथेरानला अनेक उपाहार गृहें व रहाण्याच्या सोयी आहेत, पण सरकारतर्फें जी ही व्यवस्था झाली आहे तें एक प्रकारचें पहिलेंच धाडस असून इतक्या स्वस्त दरांत इतर कोणालाही अशी खाद्यपेयाची व्यवस्था करतां आलेली नाहीं.

## ३

# कालें

कालें हें डोंगरी ठिकाण समुद्रसपाटीपासून २७०० फूट उंचीवर आहे. सन्मान्य श्री. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्राचे आजि मुख्य मंत्री यांनीं १९५७ च्या नोव्हेंबर महिन्यांत, कालें येथील पहिल्या सुटी–शिबिराचें उद्घाटण केलें !

लोणावळ्यापासून अवघ्या ५ मैलांवर हें शिबीर आहे. नयनरम्य वनश्रीच्या मध्यभागीं हें शिबीर वसविण्यांत आलें आहे; येथें अनेक पर्णकुट्या बांधण्यांत आल्या असून अल्पवेतन मिळविणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या कुटुंबांसाठीं दरदिनी ३ रुपये भाड्यानें स्वतंत्र पर्णाकुटी मिळं शकते.

लोणावळें आणि खंडाळा ह्या डोंगरी ठिकाणीं उष्णतामान जरी वाढलें तरी या कार्ल्यांच्या सुटीच्या शिबिराच्या आसपास गर्द झाडेंझुडपें असल्यामुळें येथील हवामान अत्यंत थंड व उत्साहवर्धक असतें !

आधुनिक सुखसोयींनीं सुसज्ज असेंच हें शिबीर आहे. इथें नाहीं असं काहींच नाहीं. वीजबत्ती आहे, टेलिफोनची सोय आहे, मुलांबाळांसाठीं विस्तृत क्रीडांगणें आहेत. या शिबिरापासून एकाच मैलाच्या अंतरावर मळवली हें रेल्वे-स्टेशन आहे.

मळवली या स्टेशनावर वेळच्यावेळीं आगगाड्यांची ये–जा चालू असते. मळवली रेल्वे-स्टेशन आणि कार्ल्यांचें सुटीचें शिबिर यांतील अंतर जरी ८ फर्लांगांचें असलें तरी


स्टेट ट्रॅन्स्पोर्ट बस सर्व्हिसनें हीं दोन्ही ठिकाणें प्रवाशांच्या सोयीसाठीं जोडण्यांत आलीं आहेत.

कार्ले येथील कोरीवलेणी अत्यंत प्रेक्षणीय आहेत. त्याशिवाय पश्चिम भारतांतील एकुलतें एक चैत्यमंदिर या कोरीव लेण्यांत असल्यामुळें येथील आकर्षण व सौंदर्य द्विगुणित झालें आहे. कार्ल्यांच्या कोरीव लेण्यांच्या प्रवेशमार्गी एकवीरादेवीचें प्रसिद्ध देवालय आहे.

कार्ल्यांच्या कोरीवलेणींबरोबर सात्त्विक चुरस करणाऱ्या भाजा व बेडसाच्या कोरीवलेणींही जवळपास वसलेल्या आहेत. पराक्रमी पूर्वजांच्या शौर्याचीं स्मृतिचित्रें, किल्ले लोहगड आणि विसापूर मोठ्या डौलांत उभे आहेत.

थोड्याच अंतरावर वळवण, तुंगेर्ली आणि शिरोटा हीं सरोवरें आल्हाददायक तेवढींच मनोहरी आहेत. लोणावळ्याच्या जवळपास भुशीर सरोवर आणि टायगर्स लीप हीं ठिकाणें पहाण्यालायक आहेत.

मैलांच्याच भाषेंत बोलायचें झाल्यास मुंबई शहरापासून ७५ मैलांवर आणि पुण्यापासून ३८ मैलांवर हें सुटीचें शिबीर वसविण्यांत आलें आहे.



कार्लें येथील विश्रामधामें



कालें येथील विश्रामधामें

४

०

०

# भंडारदारा

०

०

० ० ० ० ० ० ० ०

भंडारदारा हें डोंगरी ठिकाण अहमदनगर जिल्ह्यांतील आकोला तालुक्यांत आहे. कांहीं वर्षांपूर्वी या ठिकाणीं बांबूपासून केलेल्या चटईच्या झोंपड्या, तात्पुरत्या उभ्या करून, सुटीचें शिबीर थाटण्यांत आलें होतें. १९५९ च्या फेब्रुवारी महिन्यांत माननीय मुख्य मंत्री श्री. यशवंतराव चव्हाण यांच्या हस्तें सुटीच्या शिबिराच्या पक्क्या इमारतीच्या पायाचा दगड बसवण्यांत आला.

या सरकारी शिबिराव्यतिरिक्त जवळ जवळ ३०,००० चौरस फूटांचे १०० वर जमिनीचे तुकडे खाजगी रीत्या विकण्यास काढले होते. आज या सुटीच्या शिबिराची पक्की इमारत तयार झाली असून जमिनीचे तुकडेही विकून टाकण्यांत आले आहेत.

भंडारदारा हें ठिकाण समुद्रसपाटीपासून २४०० फूट उंचीवर आहे. मुंबईहून भंडारदारा ११० मैलांवर आहे तेवढेंच तें पुण्याहून आहे. मध्य रेल्वेच्या नाशिक लाईनवरील घोटी हें रेल्वेस्टेशन भंडारदाराच्या जवळांत जवळ म्हणजे २० मैलांवर आहे.

अखिल भारतांत आजपर्यंत अत्यंत उंचावर जीं धरणें बांधण्यांत आलीं आहेत त्यांत भंडारदारा धरणाचा क्रमांक पहिला लागतो. याला विल्सन डॅम म्हणतात. लेक ऑर्थर नांवाचें अत्यंत रमणीय आणि भारतांत जीं प्रचंड सरोवरें आहेत त्यांपैकीं एक, अशा ख्यातीचें हें सरोवर आहे.

या लेक ऑर्थर सरोवराची बैठक त्याच्या भोंवतालीं असणाऱ्या पर्वतश्रेणींच्या मध्यंतरीं असून या पर्वतश्रेणींतील अत्युच्च कळसुबाईचें शिखर हें महाराष्ट्र राज्यांतील अत्यंत उंच शिखर होय. याची उंची समुद्रसपाटीपासून ५६०० फूट आहे.

लेक ऑर्थर ह्या विस्तृत सरोवरावर नौकाविहार करण्याचें घाटत आहे. या सरोवरांतील नौकाविहार अत्यंत अल्हाददायक असतो. जवळ जवळ ५ मैल नौकानयन केल्यानंतर एका अतिरम्य देवालयाच्या नजीक जातां येतें.

हें देवालय अमृतेश्वराचें मंदीर म्हणून प्रख्यात आहे. १२०० वर्षांपूर्वी हें देवालय बांधण्यांत आलें असें नमूद आहे. हें देवालय पहात असतां पहाणारा मंत्रमुग्ध होतो इतकें तें सुंदर आहे. या मंदिरांतील कोरीव काम मोठें सुबक व प्रेक्षणीय आहे.

भंडारदाराच्या धरणाच्या पायथ्याशीं एक वर्तुळाकार बगीचा आहे. हा बगीचा असंख्य रंगाच्या चित्रविचित्र फुलांनीं सजलेला आहे. बगीचाच्या बाजूनें धरणांतील पाण्याचा प्रचंड प्रवाह जलद गतीनें वहात असतांना पहाण्याची मोठी मौज असते.

हा मोहक बगीचा म्हणजे भंडारदाराच्या अंगाखांद्यावरील एक अमोलिक अलंकारच आहे. भंडारदाराला येणारे जाणारे या बगीचाकडे एक विशिष्ट सौंदर्यस्थान म्हणून अलोचन नेत्रांनीं अवलोकन करत असतात. सध्यां ह्या जलप्रवाहांत स्नान करण्याची व जलविहार करण्याची सोय करण्यांत आली आहे.


भंडारदारा येथें तीन डाक बंगले आगाऊच बांधलेले आहेत. ऑर्थर लेक या सरोवराच्या पलीकडे व पुढ्यांतच सुटीच्या शिबिराची पक्की इमारत उभारण्यांत आली आहे. त्याशिवाय, जवळ जवळ ३०,००० चौरस फुटांचे जमीनिचे तुकडे खाजगी रीतीनें विकण्यांत आले असून त्या जमिनीच्या तुकड्यांवर घरकुलें बांधण्याचें, कांहीं जमीन-मालकांनीं सुरूही केलें आहे.

भंडारदारापासून ७ मैलांवरील "रंधा" धबधबा पहाण्यालायक आहे. ऑर्थरलेक या सरोवरांतून निसटणाऱ्या पाण्याच्या आहोळांतून हा धबधबा सुरू होतो. भंडारदाराहून या ठिकाणीं मोटारीनें जातां येतें. त्याशिवाय बस सर्व्हीसचीही सोय करण्यांत आली आहे.

श्रीछत्रपति शिवाजीमहाराजांचा किल्ला रतनगड आणि कळसुबाईचें शिखर यांवर भंडारदाराकडून चढून जातां येतें. भंडारदाराहून राजूर चौदा मैलांवर आहे. महाराष्ट्र राज्यांत जीं प्रचंड सर्वोदय केंद्रें आहेत त्यांपैकीं एक, राजूर येथें आहे. याशिवाय दुसरीं अनेक प्रेक्षणीय व रमणीय ठिकाणें आहेत तीं निराळींच.

नयनमनोहर भंडारदारा सरोवर व धरणापासून पुढें १३ मैलांवर उंच ठिकाणीं घाटघर आहे. भंडारदाराजवळील रस्त्याच्या मार्गानें घाटघरला जातां येतें. तेथें जाण्याचा रस्ता वनश्रीच्या मस्त सौंदर्यानें नखशिखांत नटलेला आहे.

हा रस्ता प्रचंड पर्वतश्रेणींना वळसे घालत घालत जातो. ऑर्थर लेक या सरोवराच्या नखरेल सौंदर्याकडे पहात पहात घाटघरला गेल्यावर नाशिक, अहमदनगर आणि ठाणें जिल्ह्यांचें दूरदर्शन घेतां येतें !



भंडारदाराचा विल्सन डॅम

गर्द झाडांच्या सावलींत एक टुमदार इन्स्पेक्शन बंगला आहे, ह्या बंगल्यापासून २०० यार्डांवर सिमेंटचीं बाकें ठेवण्यांत आलीं आहेत. ह्या बाकांवरून दिसणारा भोंवतालचा देखावा अत्यंत रमणीय व हृदयस्पर्शी आहे.

समोरच शिकार-टेकडी आहे. निरनिराळ्या मोक्याच्या ठिकाणावरून शिकार-टेकडीकडे अवलोकन केल्यास ही टेकडी बहुरूपी दिसते. कड्याखालीं विस्तृत मैदानें पसरलेलीं दिसत असून, पहाणाराला तीं मैदानें क्षितिजाला भिडल्याचा भास होतो. हें ठिकाण एकमेवाद्वितीय असेंच आहे. शिकार-टेकडीच्या पलीकडे किल्ले रतनगडचें स्फूर्तिदायक दर्शन होतें !

इन्स्पेक्शन् बंगल्याच्या दुसऱ्या बाजूनें अलंगड, कुरंगड आदिकरून अनेक किल्ले दिसतात. भंडारदाराला असंख्य लोक भेट देतात पण घाटघर ह्या ठिकाणाविषयीं, त्यापैकीं कांहींना गंधवार्ताही माहीत नसावी. कारण घाटघर हें आडवाटेवर आहे. प्रचंड पर्वतश्रेणीच्या कुशींत आहे, अगदीं निबिड अरण्यांत वसलेलें आहे.

भंडारदारा-घाटघर रस्ता तसा बिकट चढणीचा नाहीं पण तो वळणावळणाचा असल्यानें मोटर चालवतांना अत्यंत काळजीपूर्वक चालवावी लागते. तुम्ही जर वनश्रीचें सौंदर्य पहाण्याच्या बाबतींत शौकीन असाल तर या रस्त्यानें मोटर चालविण्याचें दिव्य न करणें बरें !

५

०

०

# प न्हा ळा

०

०

० ० ० ० ० ० ० ०

किल्ले पन्हाळा हें डोंगरी ठिकाण कोल्हापूर जिल्ह्यांत आहे. येथें सरकारी देखरेखीखालीं असणाऱ्या सुटीच्या शिबिरांत अनेक पक्कीं कुटिरें, तंबू आणि झोपड्या, अगदीं मध्यवर्ती ठिकाणीं उभारण्यांत आल्या आहेत. जवळच नयनरम्य बगीचा असून त्याचा अनावरण समारंभ मुंबईच्या ना. राज्यपालांनीं केला.


पन्हाळा, कोल्हापूर शहरापासून १२ मैलांवर आहे. हें ठिकाण समुद्रसपाटीपासून २७०० फूट उंचीवर आहे. पन्हाळ्याकडे पाहिलें असतां ऐतिहासिक घटनांचा चलचित्र-पट डोळ्यांपुढें वागडूं लागतो, इतकें नयनरम्य व इतिहासप्रसिद्ध असें हें ठिकाण आहे.

श्रीछत्रपति शिवाजीमहाराजांचें वास्तव्य पन्हाळगडीं असतांना त्यांच्या भोंवतीं सिद्दी जोहारचा वेढा पडला होता पण महाराजांनीं मोठ्या शिताफीनें सिद्दिजोहारच्या मगरमिठींतून आपली सुटका करून घेतली. ज्या ठिकाणाहून महाराज निसटले त्या ठिकाणीं आज सरकारी बंगला बांधण्यांत आला आहे.


किल्ले पन्हाळा, इ. स. १५०० सालीं इब्राहीम अदिलशहानें बांधला आणि त्याला सजाकोठी म्हणून नांव दिलें. हें ठिकाण निमुळत्या आणि उंच कड्यावर बांधण्यांत आलें आहे. श्रीसंभाजी महाराजांना याच ठिकाणीं कैदेंत ठेवण्यांत आलें होतें.

पराशरऋषींनीं पन्हाळ्याला आपलें मूळ वास्तव्य केलें होतें अशी दंतकथा आहे. आधुनिक इतिहासाच्या आधारें सिलहारा घराण्यांतील राजे २ रे भोज यांची ११९०





श्रीशिवाजीमहाराज जिवानिशीं निसटले ती सज्जा कोठी, किल्ले पन्हाळा



रांधा धबधबा

चि. २

साली पन्हाळा ही राजधानी होती. यादव व बहामनी राजांच्या ताब्यांत पन्हाळा बराच काळ होता पण अखेरीस तो छत्रपतींच्या ताब्यांत आला.

पन्हाळ्याची माती लाल भडक असून हवामानही थंडगार व उत्साहवर्धक आहे. या ठिकाणचे कांहीं जुनेपुराणे ऐतिहासिक अवशेष छिन्नविच्छिन्न परिस्थितींत असून त्यांत ' तीन दरवाजे ' हें स्थान प्रेक्षणीय आहे. ह्या दरवाजावर इ. स. ९५४ मधील हस्तलिखित अवशेष आढळतो; वाघदरवाजा, अंबरखाना या ठिकाणीं धान्याचें कोठार असून त्यांत २५००० खंडी धान्य साठवण्याची सोय, व्यवस्थित रीतीनें बांधलेल्या खणाखणांतून करण्यांत आली आहे.

पन्हाळ्याहून नयनरम्य देखावे दिसतात. हिंडण्याफिरण्याकरतां सोयीस्कर वाटा आहेत. लांबच्या पल्ल्याचा प्रवास करण्याकरतां ६ मैलांवर ज्योतिबाच्या डोंगरासारखें ठिकाण आहे. ज्योतिबाच्या डोंगरावर पुराणीं व सुंदर देवालयें आहेत आणि त्याला लागून रेडेगड हें उंचवट्याचें पठार आहे.

पन्हाळ्याहून पावनखिंडीला जाण्याचा रस्ता आहे. श्रीछत्रपति शिवाजीमहाराजांचे शूर सरदार बाजीप्रभू देशपांडे यांनीं महाराजांची विशाळगडीं सुटका करून घेण्यासाठीं याच पावनखिंडींत स्वतःचें बलिदान केलें होतें.

पन्हाळ्याला आसपासच्या खेडुतांची नेहमीं गर्दी असते. दूरवरचे नागरिक इकडे येऊन रहातात. हवा-पाणी, ऐतिहासिक महत्त्व, पन्हाळ्याहून दिसणारें नयनरम्य सृष्टी-सौंदर्य, त्या ठिकाणीं रहाण्याची व्यवस्था, कोल्हापूर शहराचें सान्निध्य आणि सातआठ मैलांच्या परिघांत ज्योतिबाचा डोंगर आणि पावनखिंडीसारखीं प्रेक्षणीय स्थळें, यांमुळें पन्हाळा हें स्थान सर्वांच्या आवडीचें झालें आहे.

मुंबईहून कोल्हापुराला एका रात्रींत जातां येतें आणि कोल्हापुराहून स्टेट ट्रॅन्सपोर्ट बसनें सरळ सडकेनें अर्ध्यातासाच्या अवकाशांत पन्हाळा हें स्थान गाठतां येतें. स्टेट ट्रान्सपोर्टच्या बसेस वारंवार सुटत असतात त्यामुळें कोल्हापूर ते पन्हाळ्याची वर्दळ सतत चालू असते.

मुंबईहून त्याचप्रमाणें पुण्याहून पन्हाळ्याला जाण्याचा रस्ता कॉंक्रीट अस्फाहाल्टचा आहे. मुंबई व पन्हाळा यांमधील अंतर २५० मैलांचें आहे. त्यामुळें तें दिवसभरांत कापतां येतें किंवा मध्यंतरीं पुण्याला मुक्काम करतां येतो.

पन्हाळ्याला कार्यक्षम डोंगरी नगरपालिका आहे. पन्हाळा येथील बगिच्यांतून चहापाणी व खाण्याची व्यवस्था या नगरपालिकेनें स्वतःच्या देखरेखीखालीं सुरू केली आहे. पन्हाळ्यासारख्या डोंगरी ठिकाणीं एक पुस्तकालय व वाचनालयाचीही व्यवस्था करण्यांत आली आहे.

६

# तोरण माळ

तोरण माळ हें सातपुड्याच्या पर्वतश्रेणींत एक अतिरम्य डोंगरी ठिकाण असून त्यासंबंधीची माहिती मर्यादित लोकांना आहे. तोरण माळ हें ठिकाण समुद्रसपाटीपासून ३४०० फुटांच्या उंचीवर असून सातपुडा पर्वतांतील तें एक अत्युच्च ठिकाण होय.

पूर्वीच्या पश्चिम खानदेशचे आणि सांप्रतच्या धुळें जिल्ह्याचें धुळें हें जिल्हाधिकाऱ्याचें प्रमुख ठिकाण होय. धुळ्यापासून तोरण माळ ८० मैलांच्या अंतरावर आहे. तोरण माळचा समावेश अकराणी महालांत वस्तुतः होतो. येथून जवळांत जवळचें रेल्वे-स्टेशन दोंडाईचा हें होय. दोंडाईचापासून, तोरण माळ ज्या पर्वतश्रेणीवर आहे त्याचा पायथा ३५ मैलांवर आहे. दोंडाईचापासून तोरण माळपर्यंत मोटरचा रस्ता आहे.

शहादे मुक्कामीं ज्यावेळीं तापीनदीवर नव्यानेंच पूल बांधण्यांत आला होता त्यावेळीं वहानें नेण्याआणण्याची व्यवस्था साधारण परिस्थितीची होती. हेल्यांच्या मदतीनें मोटर पैलतडीला न्यावी लागे. हेला हा शब्द रेड्यांचा उल्लेख करतांना बहुदा वापरतात. त्यांतून पाण्याच्या मोटी वहाणाऱ्या रेड्यांना हेले म्हणतात. परंतु दणकट बैलांच्या बाबतींतही हेला हा शब्द वापरण्याचा प्रघात आहे.

तोरण माळला जातांना राणीपूर येथील बंगल्यांत रात्र काढावी लागे. जयपाणी-पासून राणीपूर ६ किंवा ७ मैलांवर आहे आणि जयपाणी तोरण माळच्या पायथ्याशीं आहे. दुसऱ्या दिवशीं सकाळीं निबिड अरण्यांतून जयपाणीला जावें लागे. जयपाणीला

जायचें तें वळणावळणाच्या रस्त्यानें दुरळ्याच्या तोंड देत जावें लागे त्यामुळें राणीपूर ते जयपाणीला जायला अर्ध्या तासाचा अवधी लागे.

जयपाणीला पोहोंचल्यानंतर तोरण माळवर आरोहण करण्याच्या तयारीला लागावें लागे. जयपाणीपासून तोरण माळ ६ मैलांवर असून १५०० फूट चढणीवर चढावें लागे; पायवाटेनें जावें लागे. तट्टावरून किंवा पालखींतून स्वतःची वरात काढल्यास सोयीचें होत असे. तंगड्या तोडत जाणें झाल्यास प्रवास अत्यंत कष्टाचा होत असे.

केवळ एका वर्षाच्या अवधींत येथें सोयीस्कर स्थितिपालट झाला. शेवटपर्यंत मोटरीनें जाण्यास योग्य असा रस्ता तावडतोब बांधण्यांत आला. अर्ध्या वाटेवर काळेंपाणी या नांवाचें ठिकाण आहे. या ठिकाणीं एका टेकडीवरून दुसऱ्या टेकडीवर जातां येते. काळेंपाणी येथें एक विश्रांतीगृह बांधण्यांत आलें आहे. या विश्रांतीगृहावरून दिसणारें सृष्टीसौंदर्य रमणीय आहे.

काळेंपाणी या ठिकाणाहून तोरण माळच्या पठारावर जाण्याची फक्त १॥ मैलांची चढण आहे; पण ती चढण चढतां चढतां नाकीं दम येतो. पठारावर चढल्यावर पुढें तोरण माळ दीड मैलावर रहातो. तोरण माळ येथील सृष्टीसौंदर्य नेत्रदीपक आहे. येथें १॥ चौरस मैलाचें एक नयनमनोहर सरोवर असून तें डोंगराच्या शिरोभागीं आहे. सरोवरांतील पाणी निळें निळें आहे.

नितांतसुंदर असें तें सरोवर असून तें थंडगार व स्वच्छ पाण्यानें तुडुंब भरलेलें आहे. या सरोवरांत नौकाविहार, जलविहार व मासेमारी करण्याची मोठी मौज असते. तोरण माळच्या १६ चौरस मैलांच्या पठारांत हें सरोवर म्हणजे कोंदणांत बसविलेलें एक देदिप्यमान रत्नच आहे असें म्हटलें तर ती अतिशयोक्ती होणार नाहीं.


या सरोवराचे भोंवतालीं एक सरकारी इमारत आहे. १९५९ च्या हवेच्या मोसमापासून या ठिकाणीं सुटीचें शिबीर खुलें करण्यांत आलें आहे. हें शिबिर पक्कें बांधण्यांत आलें असून सरोवराच्या उघड्या सौंदर्यासमोर तें वसविण्यांत आलें आहे.

सरोवराच्या एका कुशींतील कातळ फुटलेलें असल्यामुळें कांहीं अंतरावर दुसरें एक सरोवर निर्माण झालें आहे. या सरोवराच्या सौंदर्याशीं सात्विक स्पर्धा करणारे अनेक देखावे प्रेक्षकाला स्तिमित करूं शकतात. पठारावर अधूनमधून टेकड्या पसरलेल्या असल्यामुळें त्याही सृष्टिसौंदर्यांत भर टाकतात.

ह्या टेकड्यांमध्यें निर्माण झालेली सीताखिंड अत्यंत रमणीय आहे. ती पहात असतां लोणावळ्याच्या "टायगर्स लीप" ची आठवण होते. आसपासचीं प्रचंड गिरिकंदरें-खोल खोल दऱ्याखोरीं, पहाणाऱ्याची नजरबंदी करण्याइतक्या भव्य आहेत.



तोरण माळ येथील सीताखिंड



तोरण माळ सरोवराचे किनाऱ्यावर आदिवासी नृत्य

या ठिकाणीं मोठ्यानें ओरडलें असतां चमत्कारिक प्रतिध्वनी निर्माण होतात. हे प्रतिध्वनी असे निर्माण कां होतात तें सांगतां येत नाहीं. समोरील टेकडीवरून प्रतिध्वनी परत फेंकला जात नाहीं तर ओरडणाऱ्याच्या मागाहून असंख्य प्रतिध्वनी अक्षरशः गोंगाट करतात आणि ते दूरवरच्या डोंगरावरूनही परत फेंकले जातात. खरें पाहिलें असतां त्या डोंगरांचा आणि या ठिकाणाचा अर्थाअर्थी कांहींच संबंध नसतो.

प्राचीन काळीं तोरण माळ हा मांडु राजघराण्याच्या ताब्यांत होता. मांडु राजघराण्यानें बांधलेला तिकडील एक किल्ला याची साक्ष देऊं शकतो. या ठिकाणीं कांहीं पडीक देवळें आहेत आणि येथील प्रचलित दंतकथेप्रमाणें हीं देवळें, नवनाथापैकीं संत गोरखनाथ यांनीं बांधलीं आहेत. इतकेंच नव्हे तर या ठिकाणीं पुराणे पाठबंधारे जे बांधलेले आहेत ते यांनींच, असें म्हणतात.

एका देवळांत पारसनाथांची मूर्ती असून तेथील पूजाआर्चा अजूनही चालू आहे. पारसनाथाच्या देवळाच्या आसपास दरवर्षी जत्राही भरते. या जत्रेला पारस-नाथाची जत्रा म्हणतात. कांहीं काळ या ठिकाणीं मोगलांची सत्ता होती आणि मोगल अधिकारी काळ्यापाण्याच्या कड्यावरून आरोपींचा कडेलोट करीत असत, असें म्हणतात.

तोरण माळच्या आसमंतांत दहाबारा खेडीं असून त्यांत भिल्ल वगैरे आदिवासी लोक रहातात. त्यांची भाषा मराठीच पण जरा निराळ्या पद्धतीची आहे. ते बहुधा एकलकोंड्या झोपडींत वास्तव्य करतात. सर्वसाधारण खेडुतांप्रमाणें एकत्र राहत नाहींत. सध्यां त्यांना रोजच्या रोज शिक्षण देण्यांत येत असून एकत्र रहाण्यांत कोणते फायदे असतात हें त्यांच्या मनावर बिंबविण्यांत येत आहे.

आज त्यांची ४० झोपड्यांची एक टुमदार वसाहत निर्माण करण्यांत आली आहे आणि त्यांना सरकारकडून आर्थिक व इतर सहायही करण्यांत येतें. सहकारी तत्त्वावर स्वस्त धान्याचें दुकानही सुरू करण्यांत आलें आहे. त्यांचे वारंवार सणावारी जे नृत्यसमारंभ होतात त्यांतच त्यांच्या सोयरिका जमतात.

ह्या आदिवासी लोकांना नृत्याची अत्यंत आवड असते. स्त्रीपुरुषांच्या संमिश्र समाजाचे त्यांचे नृत्यसमारंभ होत असतात. ढोलाच्या तालासुरावर त्यांचा हा नृत्याचा कार्यक्रम चढत चढत जातो आणि या प्रयोजनप्रसंगीं ते दैनंदिन दुःखाच्या व व क्लेशाच्या भावना संपूर्णपणें विसरून जातात.

येथील उष्णतामान अधिकाधिक ७० डिग्री फॅरनहाईट इतकें असतें व कमींत कमी ४० डिग्री असतें. पाऊसपाण्याचें प्रमाणही ४० इंच असतें. यामुळें बारेमास बिऱ्हाड करण्याला योग्य असें तोरण माळ हें ठिकाण आहे. या ठिकाणाचा भविष्य-काळ अत्यंत उज्ज्वल आहे!



तोरण माळ सरोवराचे किनाऱ्यावर आदिवासी नृत्य

या ठिकाणीं मोठ्यानें ओरडलें असतां चमत्कारिक प्रतिध्वनी निर्माण होतात. हे प्रतिध्वनी असे निर्माण कां होतात तें सांगतां येत नाहीं. समोरील टेकडीवरून प्रतिध्वनी परत फेंकला जात नाहीं तर ओरडणाऱ्याच्या मागाहून असंख्य प्रतिध्वनी अक्षरशः गोंगाट करतात आणि ते दूरवरच्या डोंगरावरूनही परत फेंकले जातात. खरें पाहिलें असतां त्या डोंगरांचा आणि या ठिकाणाचा अर्थाअर्थी कांहींच संबंध नसतो.

प्राचीन काळीं तोरण माळ हा मांडु राजघराण्याच्या ताब्यांत होता. मांडु राजघराण्यानें बांधलेला तिकडील एक किल्ला याची साक्ष देऊं शकतो. या ठिकाणीं कांहीं पडीक देवळें आहेत आणि येथील प्रचलित दंतकथेप्रमाणें हीं देवळें, नवनाथापैकीं संत गोरखनाथ यांनीं बांधलीं आहेत. इतकेंच नव्हे तर या ठिकाणीं पुराणे पाठबंधारे जे बांधलेले आहेत ते यांनींच, असें म्हणतात.

एका देवळांत पारसनाथांची मूर्ती असून तेथील पूजाअर्चा अजूनही चालू आहे. पारसनाथाच्या देवळाच्या आसपास दरवर्षी जत्राही भरते. या जत्रेला पारस-नाथाची जत्रा म्हणतात. कांहीं काळ या ठिकाणीं मोगलांची सत्ता होती आणि मोगल अधिकारी काळ्यापाण्याच्या कड्यावरून आरोपींचा कडेलोट करीत असत, असें म्हणतात.

तोरण माळच्या आसमंतांत दहाबारा खेडीं असून त्यांत भिल्ल वगैरे आदिवासी लोक रहातात. त्यांची भाषा मराठीच पण जरा निराळ्या पद्धतीची आहे. ते बहुधा एकलकोंड्या झोपडींत वास्तव्य करतात. सर्वसाधारण खेडुतांप्रमाणें एकत्र राहत नाहींत. सध्यां त्यांना रोजच्या रोज शिक्षण देण्यांत येत असून एकत्र रहाण्यांत कोणते फायदे असतात हें त्यांच्या मनावर बिंबविण्यांत येत आहे.

आज त्यांची ४० झोपड्यांची एक टुमदार वसाहत निर्माण करण्यांत आली आहे आणि त्यांना सरकारकडून आर्थिक व इतर सहायही करण्यांत येतें. सहकारी तत्त्वावर स्वस्त धान्याचें दुकानही सुरू करण्यांत आलें आहे. त्यांचे वारंवार सणावारी जे नृत्यसमारंभ होतात त्यांतच त्यांच्या सोयरिका जमतात.

ह्या आदिवासी लोकांना नृत्याची अत्यंत आवड असते. स्त्रीपुरुषांच्या संमिश्र समाजाचे त्यांचे नृत्यसमारंभ होत असतात. ढोलाच्या तालासुरावर त्यांचा हा नृत्याचा कार्यक्रम चढत चढत जातो आणि या प्रयोजनप्रसंगीं ते दैनंदिन दुःखाच्या व व क्लेशाच्या भावना संपूर्णपणें विसरून जातात.

येथील उष्णतामान अधिकाधिक ७० डिग्री फॅरनहाईट इतकें असतें व कमींत कमी ४० डिग्री असतें. पाऊसपाण्याचें प्रमाणही ४० इंच असतें. यामुळें बारेमास विन्हाड करण्याला योग्य असें तोरण माळ हें ठिकाण आहे. या ठिकाणाचा भविष्य-काळ अत्यंत उज्ज्वल आहे !

७

○

○

# चि ख ल दा

○

○

○ ○ ○ ○ ○ ○ ○ ○

महाराष्ट्र राज्याच्या सर्व भागांतील प्रवाशांना चिखलदा हें स्थळ तिन्ही त्रिकाळ खुणावत असतें ; " या आणि सृष्टिसौंदर्याची मौज लुटा " असें आवाहन देत असतें. आंग्लकवि मिल्टन यांच्या शब्दांत बोलायचें म्हणजे

" रसरसलेल्या फळाफुलांनीं नटलेलीं बावरें ।
हिरव्या हिरवट गायरानिं त्या चित्त होत बावरें ॥ "

चिखलदा ह्या डोंगरी ठिकाणाच्या बाबतींत वरील कडवीं सार्थ ठरतात. विदर्भाच्या अमरावति तालुक्यांत चिखलदा हें पहाडी ठिकाण वसलें आहे. नागपूर-पासून पहिल्या प्रतीच्या रस्त्यानें १६० मैलांवर व अमरावति रेल्वेस्टेशनपासून ६० मैलांवर तें वसलें आहे. मुंबईहून एका रात्रीच्या प्रवासांत अमरावतीला पोहोंचतां येतें. एलीचपूर ह्या पुराण्या नगरापासून किंवा नव्या नामाभिदानाप्रमाणें अचलपुराहून वळणावळणाच्या ३१ मैलांवर चिखलदा आहे. हा रस्ता निबिड अरण्यांतून जात असून नागमोडी वळणाचा आहे. अर्ध्या वाटेवरील घाटंग ह्या ठिकाणीं सुंदर इन्स्पेक्शन बंगला आहे. मार्गांत सिलोना नांवाचें एक मनमोहक स्थळ आहे.

आपल्या राज्यांत जीं एकंदर रम्यस्थळें आहेत त्यांत तुलनात्मक दृष्टीनें पहातां चिखलदा हें अतिरम्य ठिकाण होय. सृष्टिसौंदर्याचें वरदान या ठिकाणाला भरपूर आहे.



चिखलदा येथील विश्रामधाम



चिखलदा येथील विश्रामधामें

समुद्रसपाटीपासून हें स्थळ ३६०० फूट उंचीवर असून तें आनंददायी शीतल अशा हवामानानें भारलेलें आहे. त्याशिवाय तें सुरम्य व मोहक देखाव्यानें व ऐतिहासिक महत्त्वाच्या दृष्टीनें सुरम्य तर आहेच पण त्याबरोबर दळणवळणाच्या सोयींनीं स्वयंपूर्ण आहे.

कुडाच्या छताच्या टुमदार झोंपड्या, सडक रस्ते, दिवसाचे २४ तास विजेचा पुरवठा, पोष्ट व विद्युत् संदेशाची व्यवस्था व ट्रंकटेलीफोनची सोय या सर्व आधुनिक साधनांनीं हें ठिकाण सुसज्ज आहे.

दुधाचा भरपूर पुरवठा, भाजीपाला, फळें व कोंबड्याबदकांची लयलूट, चिखलदा या ठिकाणीं आहे. येथें एक किराणे मालाचें दुकानही थाटण्यांत आलें आहे. नव्या थाटाचीं सुटीचीं शिबिरें या ठिकाणीं बांधण्यांत आलीं असून त्यांत प्रवाशांची सोय होऊं शकते. खाजगी मालकीचे बंगलेही अनेक आहेत.

प्रवाशांच्या सुखानंदाला पूर आणणारे अनेक नयनरम्य देखावे, वाहनांतून किंवा पायींपायीं जाण्याला योग्य असे विन अडगळीचे रस्ते, नितांत सुंदर सरोवरें व धबधबे, वनस्पती व वनचरें, बहुरंगी बगीचे, बालोद्यान, टेनीस कोर्टानें सुसज्ज असा ऐन उमेदींतील तरुणांसाठीं क्लब, अशा सुखसोयींनीं मंडित असें हें ठिकाण आहे.

निमार व महादेवाच्या टेकड्या आणि त्यांना बिलगलेल्या गडद वनश्रीनें नटलेल्या दऱ्या, अनेक मोक्याच्या ठिकाणावरून दृग्गोचर होऊं शकतात आणि दक्षिणेच्या दिशेनें वऱ्हाडचीं अफाट मैदानें व बेलाघाट यांचा विस्तृत देखावा दृष्टीस पडतो. खालील कड्यावर सैतानाच्या कटोऱ्याप्रमाणें दिसणारी "अंधेरा कोरा" नांवाची अतिखोल व तिच्याकडे पहात असतां पहाणाऱ्याचें काळीज घशांत येईल अशी भीषण दरी असून तिच्या भोंवतालचे सुळकेकडे भिंतीप्रमाणें अचल उभे असल्याप्रमाणें दिसतें. कडे चढण्याची आवड असणाऱ्यांना या ठिकाणीं भरपूर वाव मिळतो.

ऐतिहासिक माहिती मिळविण्यासाठीं उत्सुक असणाऱ्यांना, किल्ले गवीलगड, थाटांत उभा असल्याचें दृष्य दिसतें. हा पहाडी किल्ला ११ व्या शतकांत बांधण्यात आला असून, वॉटर्लूच्या रणकंदनाच्या आधीं कांहीं वर्षें ड्यूक ऑफ वेलिंग्डन् यानें, तो कर्नल वेलस्ली या नांवानें इतिहासप्रसिद्ध असतांना, हा किल्ला मराठे वीरांकडून हस्तगत केला. या वेळीं इतका भीषण रणसंग्राम झाला कीं, या किल्ल्याच्या बचावासाठीं, छातीची ढाल करून उभा असलेला प्रत्येक मराठा योद्धा कापला गेला व वीरांगनांनीं एकजात प्राणाहुत्या दिल्या !!

सर्वभक्षी काळाला यशस्वी तोंड देत देत ह्या किल्ल्याचे किल्लेकोट, मोर्चे व खंदक अजूनही उभे असलेले दिसतात. त्यामुळें आसपासचा विस्तीर्ण प्रदेश लक्ष्य-वेधी दिसतो. किल्ल्याचे चार दरवाजे बचावाच्या दृष्टीनें मोक्याचे जागीं बांधण्यांत आले

असून, वर्तमानकाळीं जरी त्या दरवाज़ांना लष्करी महत्त्व नसलें तरी सृष्टिसौंदर्य-शास्त्राच्या दृष्टीनें ते आकर्षक वाटतात.

चिखलदा येथें वास करणारे स्थानिक रहिवाशी, जवळ जवळ ९०० आहेत. ते आदिवासी जमातीचे असून त्यांना " कोरकू " म्हणतात. त्यांची बोलीभाषा ऐकायला गोड, अशी विशिष्ट पद्धतीची आहे व त्यांची राहणी साधी असून ते मोठे काटक लोक आहेत. त्यांच्या मुलांबाळांसाठीं जमात-शाळा प्रस्थापित करण्यांत आल्या आहेत.

चिखलदा येथील उत्पादनांत कॉफीचे व रबराचे मळे, रोपें तयार करण्याच्या बागा व कांहीं दुर्मिळ फुलझाडें यांचा समावेश होतो. या ठिकाणीं गडद अरण्यें असून इमारतीचें लाकूड भरपूर मिळतें. येथील अरण्यांतून, चित्ते, वाघ, रानडुकरें यांसारखे हिंस्रपशू व सांबर, हरणासारखीं वनचरें आहेत.

येथें उणीव कसलीच नाहीं असें म्हणतां येणार नाहीं. चिखलदापुढें एक समस्या उभी आहे–तीही पाण्याची समस्या. तसें पाणी भरपूर आहे पण तें पुरवठा करण्याचीं साधनें उपलब्ध नाहींत. आज त्या साधनांची रूपरेखा तयार असून, तीं बांधण्याचा कार्यक्रम चालू आहे.

असें आहे आपलें चिखलदा :—


सृष्टिनिर्मिता खुशींत आला दौलत उधळी पहा।<br>
चिखलदा हें प्रतीक त्याचें नंदनवन तें महा ॥

८

# महिषमाळ

औरंगाबादेहून जवळ जवळ २२ मैलांवर किंवा खुल्दाबादेच्या पलीकडे ७ मैलांवर, सुविख्यात वेरुळचीं लेणीं पाहाण्यासाठीं निघण्याच्या प्रवेशरस्त्याच्या जवळच, समुद्रसपाटीपासून ३,००० फूट उंचीवर, महिषमाळ हें ठिकाण आहे.

महिषमाळचीं दोन पठारें किंवा घाटमाथे आहेत. त्यापैकीं एक उंचीवरील पठार व दुसरें सखल पठार. सखल पठारावर महिषासुरमर्दिनीचें एक सुंदर मंदीर आहे व



पी. डब्ल्यु. डी. बंगला
महिषमाळ

वरील पठारावर पी. डब्ल्यु. डी. चे दोन बंगले आहेत. त्यावरून विस्तृत देखावे दिसतात.

याच पठारावर सुटीचें शिबीर बांधण्याचा विचार चालू आहे ; हें ठिकाण वर्षभर थंड हवेनें भारलेलें असतें. मराठवाड्याच्या तालुक्यांतील जनतेला तें वरदानच ठरेल. त्याप्रमाणें इतरांनाही त्याचा फायदा मिळूं शकेल.

वेरूळ, अजंठा व औरंगाबाद पाहाण्यासाठीं येणाऱ्या प्रवाशांनीं महिषमाळ पाहाण्यास व तेथील सृष्टिसौंदर्य व आरोग्यवर्धक हवामान उपभोगण्यास विसरूं नये.

खुल्दाबादपासून महिषमाळपर्यंतचा रस्ता वाहनास आजही योग्य असला तरी त्या रस्त्यावर सध्यां योग्य ती सुधारणा चालू असून पाणीपुरवठ्याचीही योजना हातीं घेण्यांत येत आहे.

१

o

o

# आं बो ली

o

o

o o o o o o o o

रत्नागिरी जिल्ह्यांत आंबोली हें ठिकाण विश्रांतिधाम होण्यासारखें असून, तें समुद्रसपाटीपासून २३०० फूट उंचीवर आहे. सावंतवाडीहून आंबोली १८ मैलांवर आहे. पूर्वी सावंतवाडी संस्थानाची, आंबोली हें, उन्हाळ्यांतील थंड हवेची राजधानीच होय. सावंतवाडीच्या राजेसाहेबांचे, या ठिकाणीं दोन बंगले असून ते अजून व्यवस्थितपणें ठेवण्यांत आले आहेत. आंबोलीला जाण्याचे अनेक मार्ग आहेत.

मुंबईहून बेळगांवच्या रस्त्यानें आंबोलीला जातांना विमानमार्गाचा उपयोग करून जाण्यास १॥ तास पुरा होतो. बेळगांववरून आंबोली ४० मैलांवर आहे. बेळगांव ते आंबोली हा रस्ता मोटर वाहनास योग्य व बिन अडगळीचा आहे. दुसरा एक रस्ता वेंगुर्ल्याहून आहे. मुंबईहून वेंगुर्ल्यास जलमार्गानें जातां येतें. वेंगुलें हें रत्नागिरीचें समुद्र-किनाऱ्यावर वसलेलें एक टुमदार शहर आहे. वेंगुर्ल्याहून सावंतवाडी १७ मैलांवर असून सावंतवाडीहून आंबोलीस जाण्याला मोटर वाहनाला योग्य असा १८ मैलांचा रस्ता आहे. या रस्यावरील घाटांतील सृष्टिसौंदर्य मोहक आहे.

मोटारीनें जसें वर वर जावें तसतसा भोंवतालचा नयनमनोहर देखावा दृग्गोचर होऊं लागतो. या रस्त्यानें आंबोली गाठायला १ तास लागतो. या रस्त्यावर स्टेट-ट्रान्सपोर्टची ये-जा दिवसभर चालू असते, कारण असें कीं, सावंतवाडी ते बेळगांव हा हमरस्ता आंबोलीवरूनच जातो.

प्रत्यक्ष आंबोलीला अतिरम्य देखावे आहेत आणि त्यांमुळें पायीं सहल करण्यास मोठी मौज वाटते. सृष्टिसौंदर्य पहाण्यासाठीं मोक्याच्या ठिकाणावर जाण्यास मोटर वाहनास योग्य असे रस्ते आहेत; पण सध्यां ते नादुरुस्त अवस्थेंत आहेत. असें असलें तरी पायीं सहल करण्यास जी मजा येते ती औरच असते. येथील हवा, वर्षाचे बाराही महिने थंड व आरोग्यदायक असल्यानें कोणत्याही काळीं हें स्थळ आल्हाददायकच वाटतें.

आंबोलीच्या पठारावर निबिड अरण्य आहे. त्या अरण्यांत असंख्य पशुपक्षी असल्यानें शिकार करणाऱ्यांना ती एक प्रकारची मेजवानीच वाटते. आंबोलीच्या पाठीशीं मुद्दाम सांगण्यासारखा इतिहास नसला तरी तें प्रदीर्घकाळ विश्रांतिधाम असल्याचा, त्या स्थळाचा हक्क, अबाधित आहे.

प्रत्यक्ष आंबोलीच्या पाठीशीं कांहीं इतिहास नसला तरी आंबोलीहून अनेक ठिकाणाहून दिसणारे किल्ले मंचर व मनसंतोष हीं स्थळें ऐतिहासिक महत्त्वाचीं आहेत. हे दोन्ही किल्ले समुद्रसपाटीपासून सारख्याच उंचीवर असून २०० यार्ड रुंदीच्या दरीनें ते विभागित झाले आहेत.

पांडवांच्या काळापासून मंचर हा किल्ला बांधण्यांत आल्याची आख्यायिका आहे. १८४४ मध्यें इंग्रजांच्या दृष्टीनें बंडखोर ठरलेल्या लोकांनीं तो हस्तगत केला होता व तीन महिन्यांवर त्यांनीं त्याचा ताबा सोडला नव्हता. अखेरीस सेनापती डिलामॉटे यानें प्रखर रणकंदन करून तथाकथित बंडखोरांना पिटाळून लावलें असें इतिहास सांगतो.

आंबोलीला वास्तव्य करीत असतां साहसप्रिय राकट प्रवाशाला आंबोली ते मंचर प्रवास करण्याचा कार्यक्रम मोठा मजेदार वाटेल.

या ठिकाणीं प्रवाशांना रहाण्यास योग्य अशी इमारत असून त्याला जोडून एक पडवी आहे.

आवश्यक वस्तु विकत घेण्यासाठीं लहान लहान दुकानें आहेत पण तीं सुधारावीं लागतील व वाढत्या गरजेप्रमाणें तीं सुधारतांही येतील. आंबोलीच्या मानाने पाणी भरपूर आहे आणि विजेचा पुरवठा होणें शक्य आहे.

आंबोलीचा विकास करणें झाल्यास, आसपास मुबलक जमीन असून त्यांतील कांहीं तुकडे विवक्षित मुदतीपर्यंत, शर्थींवर भाड्यानें देण्यासारखे आहेत.

आंबोलीचा विकास केल्यास, रत्नागिरी, बेळगांव व आसपासच्या जिल्ह्यांतील रहिवाशांना तें वरदानच ठरेल.

अशीं ठिकाणें विकसित झालीं व त्या ठिकाणीं विश्रांतिधामें प्रस्थापित केलीं कीं, जवळपासच्या जिल्ह्यांतील रहिवाशांप्रमाणें दूरदूरच्या, त्याचप्रमाणें दुसऱ्या राज्यांतील जनतेलाही, तीं फायदेशीर ठरतात, असें दिसून येतें. अशा स्थळांची लोकांना किती निकड आहे हें यावरून प्रत्ययास येतें.

वि. ३



आंबोलीचा डोंगर–रत्नागिरी जिल्हा



आंबोलीपासून ३५ मैलांवर असणारा वेंगुर्ल्याचा समुद्रकिनारा

१०

०

०

# ज व्हा र

०

०

० ० ० ० ० ० ० ०

मुंबईंत गुलाबाचें भरगच्च फूल पाहिलें कीं, तें डहाणूचें आहे असें धरून चालतात. महाराष्ट्र राज्यांतील फळांफुलांचें नंदनवन म्हणजे डहाणू. भाजीपाल्यांत समृद्ध असें हे ठिकाण आहे. मोठमोठ्या बगीचांनीं मंडित असें हें स्थळ असून डहाणू हें गवताचें आगर असल्याचा लौकिक आहे. विपूल झाडझाडोऱ्यांनीं गर्द अशा या ठिकाणीं वाड्या आहेत. डहाणू, समुद्रकिनारीं असल्यानें सुटीचे दिवस सुखासमाधानांत घालविणारांचें तें अत्यंत आवडीचें ठिकाण होतें व आजही आहे.

येथील समुद्रकिनाऱ्यावरील बागायती, जमीनजुमला तुफानी समुद्राच्या भक्ष्य-स्थानीं पडूं नये याकरतां किनाऱ्याकिनाऱ्यानें मोठमोठ्या वृक्षांची लागवड करण्यांत आल्यानें दर्याकिनारा मोहक दिसतो व त्यावरून वाहनांतून सहल करतांना मौज वाटते. किनाऱ्यावरील हॉटेलांचे किंवा विश्रांतिगृहांचे व्यवहार सुस्त दिसले तरी तीं अजून चालू स्थितींत आहेत.

रेल्वेमार्गानें मुंबईहून डहाणू गाठण्यास तीन तास लागतात. डहाणूच्या पलीकडे ३५ मैलांवर जव्हार वसलेलें आहे. कांहीं काळापूर्वी जव्हार ही जव्हार संस्थानाची राजधानी होती व आज ठाणें जिल्ह्यांतील तें एक तालुक्याचें ठिकाण आहे. येथील एकंदर लोकवस्ति ४,००० असून त्यांतील बहुसंख्य आदिवासी आहेत.

जव्हारचे महाराज हीज् हायनेस श्री पतंगासहजी हे देखील आदिवासी जमातीचेच होत. जव्हार संस्थान प्रस्थापित झाल्यापासून चालू पिढी १३ वी होय. ह्या संस्थानाच्या ताब्यांत १८ किल्ले व विस्तृत प्रदेश होता.

सध्याचे राजेसाहेब हे भारतीय लोकसभेचे माजी सदस्य होते. त्यांच्या म्हणण्याप्रमाणें जव्हार संस्थानाची प्रस्थापना १,३०० वर्षांपूर्वी झाली. जव्हार संस्थानच्या एका चिमुकल्या टेकडीच्या माथ्यावर, श्रीपाळ नांवाचें एक टुमदार गांव असून त्या गांवीं प्रत्यक्ष श्रीछत्रपति शिवाजीमहाराज आले होते; त्या वेळीं हें गांव एक प्रेक्षणीय स्थळ करावें या सूचनेचा खल श्रीशिवाजीमहाराजांनीं जव्हारच्या आदिवासी नरेशापाशीं केला होता.

जव्हार हें पहाडी स्थळ करण्याला अत्यंत योग्य ठिकाण ठरेल. समुद्रसपाटीपासून तें १५०० फूट उंचीवर आहे आणि तिथें जातांना रानांवनांतून जावें लागतें. मुंबईहून सडकेनें जव्हार हें अवघ्या ८० मैलांवर आहे. हा रस्ता भिवंडी, वाडें व पालीहून जात असून ४ तासांच्या आंतबाहेर जव्हारला पोहोंचतां येतें.

दिवसभर सहल करण्याच्या दृष्टीनें जव्हार हें आदर्श स्थळ आहे. आठवड्याच्या अखेरीस श्रमपरिहार करण्यास जाण्यासाठीं हें ठिकाण योग्य आहे. जव्हारला सर्किट हौस नांवाची, प्रवाशांच्या सोयीची, एक इमारत आहे. पूर्वकालीं जव्हारच्या नृपतींचे पाहुणे, या इमारतींत उतरत असत. सर्किट हौसमध्यें ४ दालनें आहेत. जव्हार येथील अनेक मोक्याच्या ठिकाणाहून सृष्टिसौंदर्याचे सुंदर सुंदर देखावे दिसतात.

आसमंतांत निबिड अरण्य असल्यानें वर्षाचे बाराही महिने, या ठिकाणीं समशीतोष्ण वारे वाहत असतात. जव्हारच्या नरेशांनीं नव्यानें एक सुंदर राजप्रासाद बांधला आहे. येथील लाल व सुपीक मातींत त्यांनीं काजूची भरपूर लागवड केली आहे. काजूच्या लागवडीला अशीच भूमि लागत असते.

जव्हारमध्यें उन्हाळ्यांत पाण्याची टंचाई भासे; पण सध्यां पाणीपुरवठ्याची योजना हातीं घेण्यांत आली असून ती लौकरच पुरी होईल.

डहाणूपासून कासापर्यंत सिमेंट कॉंक्रीटचा रस्ता बांधण्यांत आला आहे. कासा येथें सर्वोदय केंद्र असून तेथें गेल्यास आदिवासी लोकांच्या, हस्तकौशल्याच्या वस्तूंचें प्रदर्शन पहाण्यास मिळतें.

कांहीं मैलांवर तेलवाडा या ठिकाणीं आदिवासी जमातीच्या ४०–५० मुलांसाठीं एक आश्रमी शिक्षण-संस्था प्रस्थापित करण्यात आली आहे. आपल्या महाराष्ट्र-राज्यांतील अशा तऱ्हेची संस्था ही पहिलीच होय. भारतांतील अत्यंत मागासलेल्या जमातींतील हीं मुलें असूनही या नयनमनोहर ठिकाणच्या ताज्या व मोकळ्या हवामानामुळें, त्यांचें प्रकृतिमान सशक्त, रेखीव व पहाण्यालायक आहे.

११

○

○

# राधानगरी

○

○

○ ○ ○ ○ ○ ○ ○ ○

खुद्द कोल्हापूर शहरापासून ७० मैलांवर व गारगोटीहून ३० मैलांवर राधानगरी हें स्थान आहे. गारगोटी येथें एक खेडुत विद्यापीठ प्रयोगावस्थेंत आहे. गारगोटीहून राधानगरीला जाणारा रस्ता सुंदर असून त्यावरून जातांना दिसणारे सृष्टिसौंदर्याचे देखावे मोहक व रम्य आहेत. रस्त्याचा शेवटचा टप्पा, घाटमाथ्यावरून जात असल्यानें तेथून दिसणारें सृष्टीसौंदर्य अधिक मोहक आहे.

प्रत्यक्ष राधानगरी नयनरम्य आहे. जलविद्युत्योजनेचें तें एक ठिकाण असून तें राज्यांतील पुराणें ठिकाण आहे. हल्लीं तें विकसित करण्यांत आलें आहे.

राधानगरीला एक रम्य सरोवर असून त्यांत मधोमध एक चिमुकलें बेट आहे. कोल्हापूरच्या महाराजांनीं त्या बेटावर शिकारीचें किंवा विश्रामधाम स्थापन केलें आहे; सध्यां तें उपयोगांत नाहीं. भोंवताली पर्वतश्रेणी असल्यानें तें अत्यंत रम्य दिसतें.

कोल्हापुरच्या महाराजांनीं डोंगराच्या शिखरावर एक सुंदर प्रासाद बांधला असून पायथ्याशीं महाराष्ट्र सरकारनें अधिकाऱ्यांसाठीं व प्रवाशांसाठीं एक विश्रामधाम बांधलें आहे.

येथील धरण ३,८०० फूट लांबीचें व भुईतळापासून १४२ फूट उंचीवर असून ४,८०० किलोवॅट वीजशक्ति निर्माण करतें. सरोवरांत ८ अब्ज, पंचेचाळीस कोटि घन-फूट पाण्याचा साटा करतां येतो. पाणी अडविण्याचें क्षेत्रफळ ४२ चौरस मैलांचें आहे.

१२

○

○

# मुरूड

○

○

○ ○ ○ ○ ○ ○ ○ ○

कुलाबा जिल्ह्यांत पूर्वीचें जंजिरा संस्थान होतें. या संस्थानाचें रूपांतर जंजिरा महाल या नांवांत झालें आहे. या महालांत मुरूड हें प्रेक्षणीय स्थळ आहे व तें ससुद्रकिनाऱ्यावर वसलें असून पर्वतश्रेणींनीं अलंकृत असें आहे. हें रम्यस्थान जवळ जवळ अनुल्लेखित आहे असें म्हटलें तर ती अतिशयोक्ति होणार नाहीं.

एक उत्कृष्ट विश्रामधाम होण्यास मुरूड हें अत्यंत योग्य स्थळ आहे. येथील समुद्रकिनारा विस्तीर्ण आहे आणि नबाबसाहेबांच्या राजप्रासादापासून जवळ जवळ अर्ध्या मैलावरील एका टेकडीच्या माथ्यावर पाहुण्यांच्या सोयीची अशी एक टुमदार इमारत आहे. सुंदर आंगठीच्या कोंदणांत बसविलेल्या हिरकणीसारखी ही इमारत आहे. त्या इमारतीच्या जवळच अफाट उफाळलेला दर्या, नभोमंडळांतील लुकलुकत्या तारकांप्रमाणें चमकणारा दर्याकिनारा, समुद्राच्या विस्तारावर तरंगणारीं असंख्य गलबतें आणि अधून मधून कधींतरी नांगर टाकलेली आगबोट, असा हृदयस्पर्शी देखावा या इमारतींतून दृष्टोत्पत्तीस पडतो. इतक्या रमणीय परिसरांत असलेली ती इमारत मात्र आज उदासीन परिस्थितींत आहे.

एका वाफरांतून आम्ही मुंबईहून या ठिकाणीं तीन तासांत पोहोचलों. त्या वेळीं एका टेकडीच्या शिखरावर बांधलेला एक नयनमनोहर राजप्रासाद आम्हांला दिसला. दिसणें व असणें यांत कितीतरी फरक असतो. दूर अंतरावरून तो राजप्रासाद रमणीय

दिसतो खरा, पण जवळ जातांच त्या विस्तृत प्रासादाची दुर्दम्य परिस्थिति पाहतांच अंतःकरण दुःखातिशयानें व निराशेनें भारावून जातें.

पूर्वकाळीं मुरूड ही जंजिरा संस्थानाची राजधानी होती, पण आज नबाबसाहेबांचे वास्तव्य त्या ठिकाणीं नाहीं. पूर्वकाळच्या वैभवाला अनुसरून मुरूड येथें एक विस्तृत दरबार हॉल आहे व या ठिकाणीं आज दिवसपर्यंत सार्वजनिक प्रयोजनें होत असतात. मुरूडला मोठमोठ्या सुपारीच्या बागा आहेत. नारळाच्या उपवनांतून अमृततुल्य मधुर पाण्यानें भरलेलीं शहाळीं मिळतात व भरपूर मासेही मिळतात.

मुरूड हें प्रशांत सुंदरस्थळ आहे. येथील हवामान थंड असून सृष्टिसौंदर्याच्या सान्निध्यांत या ठिकाणीं एकांत असूनही एकांतांतील भीषणता मनाला क्वचितच जाणवते. आठवड्याच्या अखेरचे सुटीचे दिवस मजेंत घालविण्यासाठीं किंवा अधिक काळ वास्तव्य करण्यासाठीं हें ठिकाण सोयीचें आहे. पावसाळ्यांतील वादळी दिवस सोडून मुंबई बंदरांतून रोज सकाळीं ८ वाजतां एक बोट सुटते व ती तीन तासांत जवळ जवळ ११च्या सुमारास मुरूडला पोहोंचते.

प्रत्यक्ष मुरूड बंदरावर पाय ठेवण्यास तरींतून जावें लागतें. परत प्रवासासाठीं मुरूडला रात्रीच्या प्रहरीं आगबोट पकडावी लागते व ती मध्यरात्रीच्या नंतर, पहाटेपूर्वी दोन वाजतां मुंबई बंदराला लागते.

मुरूडहून जंजिऱ्याचा अजस्र किल्ला पहाण्याकरतां जातां येतें. आगबोटीनें मुंबईहून मुरूडला येत असतां दुसऱ्या एका किल्ल्याचें दर्शन होतें. जंजिऱ्याचे हल्ले परतविण्यासाठीं हा किल्ला छत्रपति शिवाजीमहाराजांनीं बांधला होता. आज तो डागडुजीविरहित पडक्या परिस्थितींत आहे. श्रीछत्रपति शिवाजीमहाराजांचा दुसरा प्रचंड दर्यावर्दी किल्ला म्हणजे मालवणचा किल्ले सिंधुदुर्ग हा होय. जंजिऱ्याजवळ बांधलेला हा शिवरायांचा किल्ला सिंधुदुर्गाच्या पासंगालाही उभा रहाणारा नाहीं.

शिद्दीलोकांनीं खोल समुद्रांत, असंख्य समस्यांना तोंड देऊन, जंजिऱ्याचा कणखर किल्ला बांधला. या किल्ल्याचें बांधकाम म्हणजे वास्तुकौशल्यांतील एक महदाश्चर्यच होय. आज तीन शतकें हा किल्ला समुद्रांतील अजस्र लाटांना तोंड देत उभा आहे.

१३

○

○

# भीमाशंकर

○

○

○ ○ ○ ○ ○ ○ ○ ○

अखिल भारतांतील शंकराच्या बारा ज्योतिर्लिंगांपैकीं भीमाशंकर येथील एक ज्योतिर्लिंग होय. भीमाशंकरची टेकडी अत्यंत पवित्र मानली जाते.

पुण्याहून भीमाशंकर ७५ मैलांवर आहे. पुण्याहून भीमाशंकरला जाणारा रस्ता पक्का बांधण्यांत आला आहे. शेवटच्या २० मैलांचा रस्ता मात्र अस्फाल्टचा नाहीं. पुण्याहून नाशिकला जाणाऱ्या रस्त्यावर भीमाशंकरची टेकडी आहे. याच रस्त्यावर मध्यंतरीं मोशी व चाकण लागतें. चाकणला आठवडयाचा बाजार भरतो व त्याठिकाणीं तीन लाख रुपयांची देवाण-घेवाण होते. जुन्नर तालुक्यांतील दुसरें महत्त्वाचें शहर, खेड हें होय. त्याचप्रमाणें मंचर व घोडेगांव हीं विस्तृत गांवें होत.


भीमाशंकरला जातांना घोडेगांव मुक्कामीं कांहीं काळ विश्रांति घेतां येते. या गांवीं एक अरण्यवासी बंगला आहे व ह्या बंगल्यावरूनच भीमाशंकरच्या चढणीला सुरुवात होते. मध्यंतरीं, शिनोली, डिंबें, पाखरी व तळेघर हीं गांवें लागतात.

दरवर्षी फेब्रुवारी महिन्यांत भीमाशंकरला जत्रा भरते व या जत्रेला अखिल भारतांतून जवळ जवळ दहा हजार यात्रेकरू येतात. येथील रस्ता रुंद असून मोटर वाहनास योग्य आहे. हा रस्ता इतका रुंद आहे कीं येत्या व जात्या बसगाडया सहजासहजीं जाऊं शकतात. परंतु हा रस्ता जानेवारीपासून मे महिन्यापर्यंत किंवा पावसाळा सुरू होईपर्यंतच वापरतां येतो. त्यानंतर तो पुरांत गडप होऊन त्यावरून मोटरींतून सहल करणें धोक्याचें असतें.


समुद्रसपाटीपासून भीमाशंकर ३,४०० फूट उंचीवर आहे व तें गर्द अरण्यांत वसलें असून तें श्वापदांनीं गजबजलेलें आहे. अनेक मोक्याच्या ठिकाणाहून दिसणारें सृष्टिसौंदर्य रमणीय आहे. भीमाशंकरचें पवित्र मंदीर सखलांत २०० फूट खोलीवर असून तेथील रस्ता ओबडधोबड आहे. या ठिकाणीं थोड्याशा झोंपड्या असलेलें चिमुकलें गांवही आहे.

टेकडीच्या माथ्यावर एक रानवट बंगला असून त्यांतून सृष्टिसौंदर्याचे देखावे दिसतात. अनेक जिल्ह्यांचे भाग या ठिकाणावरून दृष्टीस पडतात. वर्षाचे बाराही महिने येथील हवामान सौख्यदायक असतें.

त्या रानवट बंगल्याव्यतिरिक्त दुसरी कसलीही इमारत नाहीं. पाण्याची टंचाईच असते, मात्र कधींतरी जाणाऱ्याला पाणी मिळतें. भीमाशंकरहून अगदीं जवळचें रेल्वे-स्टेशन पुणें हेंच होय. मात्र कर्जतहून पक्का रस्ता बांधल्यास कर्जत हें रेल्वेस्टेशन येथून फक्त २५ मैलच आहे.



भारतांतील १२ ज्योतिर्लिंगांपैकीं एक ज्योतिर्लिंग असलेलें
भीमाशंकराचें एक देऊळ



भीमाशंकराच्या टेकडीवरून दिसणारा देखावा

१४

०

०

# हेळवाक

०

०

० ० ० ० ० ० ० ०

तुमचे सुटीचे दिवस आनंदांत घालविण्यासाठीं तुम्हांला दूरवर जातां येणें शक्य नसलें तर एका अगदीं नवख्या ठिकाणीं, आपण थोडया दिवसांसाठीं जाऊं शकतां. हें ठिकाण म्हणजे हेळवाक. तें कोयना खोऱ्यांत वसलें आहे. तेथील जलविद्युत् योजनेमुळें कोयना खोरें कर्मधर्मसंयोगानें इतिहासप्रसिद्ध होणार. आपल्या राज्याच्या विकासाचें तें प्रमुख ठिकाण होय.

जलविद्युत् योजनेबरोबर तेथील सृष्टिसौंदर्य स्वयंपूर्त आहे. सातारा जिल्ह्याच्या या सृष्टिसौंदर्याच्या दृष्टीनें मातबर अशा प्रदेशांतून हेळवाकच्या कडेकडेने नितांत शांत कोयना नदी वाहते. निर्जन रानांतून निर्भयपणें वहाणाऱ्या या नदीच्या भोंवतालीं लांबवर पर्वतांच्या रांगा उभ्या असलेल्या दिसतात.

एका कवीनें कोयनेच्या उपयुक्ततेचें वर्णन केलें असून त्यांतील तीन कडवीं दिल्याशिवाय रहावत नाहीं.

अमृतकुंडीं बुडून मृत्यूवश मानव झाला ॥<br>
मानवतेचा लोप होउनी अनर्थ ओढवला ॥ १ ॥<br>
मधुर जलाशयीं तरंगणारा तहानेला राहिला ॥<br>
अन्नपूर्णा कोयनाकाठीं भूकपिडित झाला ॥ २ ॥<br>
गेले दुर्दिन विपत्काळ तो गेला निपटून ॥<br>
परस्परांची ओळख पटली उजळे सौख्यदिन ॥ ३ ॥

पुण्याहून सातान्याला जाऊन हेळवाकला जातां येतें. हा प्रवास एकंदर ९९ मैलांचा आहे. सातान्याहून हेळवाक ३० मैलांवर असून पुणें व सातान्यामधील अंतर ६९ मैलांचें आहे. पुण्याहून स्टेट ट्रान्सपोर्टची बस सुटते ती पहिल्या प्रतीच्या रस्त्यानें सातान्याला येते. सातान्याहून हेळवाकला जाण्याचा रस्ताही पक्का व चांगला असून मध्यंतरीं दिसणारें सृष्टिसौंदर्य अत्यंत मोहक आहे.

हेळवाकला एका गर्द आंबराईमध्यें इन्स्पेक्शन बंगला असून, त्या आंबराईंत शिरल्याशिवाय तो दिसूं शकत नाहीं. या ठिकाणीं रात्र मोठ्या मौजेंत घालवितां येते. येथील वातावरण थंड व प्रशांत आहे.

त्या ठिकाणीं धरणाचें प्रचंड कार्य चालू असल्यानें कसलीच वाण पडत नाहीं— आणि इतकें मोठें काम चालू असतांही हेळवाक येथील बंगल्यांत रहाणान्या प्रवाशाला त्याचा उपसर्ग पोहोंचत नाहीं कारण धरणाचें काम बंगल्यापासून दूरच्या अंतरावर चालू आहे.

भल्या पहाटें उठून त्या आंबराईच्या बाहेर येतांच तुम्हांला काय दिसेल ? सृष्टि-देवतेनें भरजरी हिरवागार शालू नेसून तुमचें आदरातिथ्य करण्यास ती उत्सुक झाली असल्याचें तुम्हांला दिसेल. आसपासचे प्रचंड डोंगर एकमेकांशीं "फ्रीस्टाईल" कुस्त्या खेळत असल्याचा तुम्हांला भास होईल. चोहोंकडे हिरवी हिरवळ पसरली असून दूरवरचे देखावे तुमच्या दृष्टीस पडून तुमच्या नेत्रांचें पारणें फिटेल !

डोंगरांच्या परिसरांत तुम्हाला मोकळ्या मनानें हिंडतां येईल. ह्याच त्या सह्याद्री पर्वताच्या रांगा. श्रीमच्छत्रपति शिवाजीमहाराजांचें क्रीडांगण ! सातान्याहून हेळवाकला येत असतां, शेवटच्या टप्प्यांत तुमच्याशीं शर्यतीच्या आविर्भावांत दौडणारी कोयना नदी तुम्हाला सामोरी आलेली दिसेल. यासाठीं तुम्हांला किंचित् पुढें जावें लागेल. याच ठिकाणीं जलविद्युत् योजनेसाठीं धरण बांधण्यांत आलें असून त्यापायीं कोट्यवधि रुपयांचें कुबेरधन कामीं आलें आहे.

ह्या मोक्याच्या ठिकाणाहून कोयनेचें दृश्य पहात असतां मन इतकें हरपून जातें कीं, नेहमींचा श्वासोच्छ्वास घेण्याचेंही धड भान रहात नाहीं. कोयनेचें धरण पुरें झाल्यानंतर दहा वर्षांच्या आंत या स्थळीं सुंदर राष्ट्रीय उपवनाच्या स्वरूपांत एक विश्रामधाम तयार होईल. अमेरिकेच्या मोठमोठ्या योजनांच्या परिसरांत, याच धर्तीचीं उपवनें व विश्राम-धामें असतात.

१५

○

○

# रत्नागिरी–कोंकणची राणी

○

○

○ ○ ○ ○ ○ ○ ○ ○

रत्नागिरीला कोंकणची राणी म्हणतात. येथील सृष्टीसौंदर्य अक्षरशः उताला आलेलें असून त्याचें कौतुक करणाऱ्यांची अजून उणीव जाणवते. रत्नागिरीच्या हापूस आंब्यांची तेवढी माहिती आपल्याला असते. आपल्या राज्यांत अनेक पहाडीं स्थळें आहेत तेथील सृष्टिसौंदर्यही सर्वश्रुत आहे. पण आपण रत्नागिरी पाहिल्यानंतर आपली खात्री पटेल कीं रत्नागिरीचें सौंदर्य कांहीं आगळेंच आहे. आपण रत्नागिरी, एवढ्या वर्षांत पाहिलें नसेल तर एकदांतरी ते पहा, म्हणजे वरील म्हणण्याची प्रचिती तुम्हांलाही पटेल.

ह्या आंब्यांच्या भूमीत, सुविख्यात लोकनेतेही जन्मले आहेत. लोकमान्य बाळ गंगाधर टिळक, बी. जी. गोखले, बी. जी. खेर; स. का. पाटील आणि आपल्या सर्वमान्य पंडित गोविंद वल्लभपंतांचे पूर्वज व कित्येक ज्येष्ठ लोकनेते रत्नागिरीला जन्मले. रत्नागिरीला बंदर आहे, त्याप्रमाणें अजस्र किल्लाही आहे; रत्नागिरीच्या पाठीशीं इतिहास आहे, त्याप्रमाणे कांहीं गौप्येंही आहेत; रत्नागिरीचा समुद्रकिनारा नयनमनोहर आहे, त्याप्रमाणे तेथील नारळीच्या अफाट बागाही मनोहारी आहेत; रत्नागिरीचा प्रचंड दर्या व दर्याकिनारा, रत्नागिरीच्या सखोल खाड्या, उजाड कोळीवाडे, अरुंद रस्ते व रस्त्याच्या दोन्ही बाजूंनीं उभे असणारे वृक्षराज, रत्नागिरीच्या समुद्रकिनाऱ्याचा उंच व आंत गेलेला भाग, आगबोटींतील उतारूंसाठीं बांधलेला धक्का आणि किंचित् आधुनिक धर्तीवर बांधलेलें शहर, एकदा पहा तर खरें.

*मुंबईहून रत्नागिरीला वाहनाच्या किंवा खुष्कीच्या रस्त्यानें जात असतां सृष्टी-सौंदर्याची मेजवानीच उपभोगतां येते. मुंबई ते रत्नागिरी हें २५० मैलांचें अंतर आहे. रत्नागिरीला जाण्याला दुसरे दोन मार्ग आहेत – आगगाडीनें कोल्हापूरला जाऊन तेथून ८० मैलांवरील रत्नागिरीला पोहोंचायचें, हा एक मार्ग व दुसरा दर्यामार्ग; मुंबईहून रत्नागिरीला आगबोटीनें जाण्याला ११ तास लागतात.*

मात्र वाहनाच्या रस्त्यानें रत्नागिरीला जाण्याची मजा कांहीं औरच असते. हा प्रवास दोन टप्प्यांत करतां येतो. पहिला टप्पा कशेडीपर्यंतचा. कशेडी हें एक मोहक ठिकाण आहे. मुंबईहून रत्नागिरीच्या बरोबर अर्ध्या वाटेवर तें असून कुलाबा जिल्हा व रत्नागिरी जिल्हा या दोन जिल्ह्यांच्या सरहद्दीवर वसलेलें आहे.

कशेडीपासून रत्नागिरीपर्यंतचा ४० मैलांचा प्रवास मोठा सौख्यदायक होतो. मधून मधून नदीकिनाऱ्यावरून दौड मारावी लागते. रत्नागिरीच्या जवळपास येतांच प्रेक्षणीय बंदर दृष्टोत्पत्तीस पडतें. रत्नागिरीच्या कलेक्टरसाहेबांचा बंगला अत्यंत उंच ठिकाणीं बांधण्यांत आला आहे.

या ठिकाणीं ब्रह्मदेशच्या पदच्युत थिबा राजाचा राजप्रासाद होता; आपल्या गतवैभवाची व सत्तेची स्मृति जागृत ठेवण्यासाठीं ते आपला दरबार भरवत असत. विसाव्या शतकाच्या सुरवातीला या घटना होत असत.

इ. स. १३५० आणि १५०० च्या दरम्यान रत्नागिरीचा किल्ला बांधण्यांत आला. ह्या किल्ल्याची उंची २०० ते ३०० फूट असून दक्षिण दिशेला तो अधिक उंच आहे. याच जागीं दीपग्रह बांधण्यांत आलें आहे. या ठिकाणाहून रत्नागिरीचें विविध



किल्ले रत्नागिरी

सौंदर्य दृष्टीस पडतें. त्यांतल्या त्यांत, आंतील कोट आणि बालेकिल्ला प्रेक्षणीय आहे. बालेकिल्ल्यावर जाण्यासाठीं मोटर वाहनाला योग्य असा रस्ताही आहे. हा बालेकिल्ला अलग आहे. श्रीछत्रपति शिवाजीमहाराजांनीं स्वसंरक्षणाच्या दृष्टीनें किल्ला बळकट केला होता व महाराजानंतर मराठ्यांचे नाविक प्रमुख आंग्रे यांनीं देखील त्याच दृष्टीनें अजस्र बांधकाम केलें होतें. श्री. भागोजी बाळोजी कीर यांनीं किल्लेकोटांत व बाले-किल्ल्यांत दोन देवळें बांधलीं.

ह्या किल्ल्यापासून ३ मैलांवर मिर्या बंदर असून त्या ठिकाणीं जाण्याच्या चिंचोळ्या रस्त्याच्या दोन्ही बाजूंनीं नारळीचीं झाडें लावण्यांत आलीं आहेत. रत्नागिरी शहर व बंदर यांमध्यें रेताड पायवाट आहे. येथील समुद्रकिनारा युरोपियन रहिवाश्यांचा व प्रवाश्यांचा मोठ्या आवडीचा होता.



चिपळूण जवळील-परशुराम मंदिरांतून दिसणारा देखावा

१६

○

○

# रा जा पू र

○


○

○ ○ ○ ○ ○ ○ ○ ○

रत्नागिरीहून चाळीस मैलांवर वळणाच्या रस्त्यावर राजापूर वसलें आहे. रत्नागिरी जिल्ह्यांत जीं जुन्यांत जुनीं महत्त्वाचीं आणि रमणीय शहरें आहेत त्यांपैकीं राजापूर हें एक होय. १६४९ सालीं इंग्रजांनीं या ठिकाणीं एक कारखाना सुरू केला होता. त्या कारखान्याचें रूपांतर आज मामलेदार कचेरींत झालें आहे. या कारखान्यावर श्रीछत्रपति शिवाजीमहाराजांनीं दोन वेळा हल्ला चढविला होता.

राजापुराहून दोन मैलांवर उन्हाळी झरे असून ते विवक्षित पद्धतीनें बांधण्यांत आले आहेत. पाण्याचीं कुंडें असून त्यांमध्यें उंच भिंत बांधून स्त्रियांसाठीं व पुरुषांसाठीं असे दोन निराळे भाग करण्यांत आले आहेत. त्यापुढें ३ फर्लांगांवर व १५० फूट उंचीवर गंगेचा उगम असून दर तीन वर्षांनीं ही गंगा प्रगट होते व अचानकपणें गुप्त होते. रत्नागिरी जिल्ह्यांतील हें महदाश्चर्य होय असें मानण्यांत येतें. इंदूरच्या महाराणी अहिल्याबाई होळकर यांनीं १६ व्या शतकांत या गंगेवर घाट बांधले.

या जिल्ह्यांत जर बरेच दिवसांचा प्रदीर्घ प्रवास केला तर कुतूहल निर्माण करणारीं अनेक स्थळें पहाण्यास मिळतात. पण त्यांपैकीं उपरिनिर्दिष्ट स्थळें महत्त्वाचीं होत. या सर्व ठिकाणीं प्रवाश्यांसाठीं सोयीचे बंगले असून त्यावरील रक्षक आगाबू कळविल्यास त्यांना चांगलें जेवण देऊं शकतात.



राजापूरची गंगा

मराठी ग्रंथ संग्रहालय
भूप्रवास
९०२
क्र. ८८८१८
३१-३-६७
संदर्भ शाखा (प्रत)

१७

# अजण्टाचीं कोरीव लेणीं

महाराष्ट्र राज्याच्या विस्तारांत ज्या अमूल्य ठेवींचा समावेश होतो त्यांपैकीं, औरंगाबाद जिल्ह्यांतील अजण्टा व वेरूळचीं कोरीव लेणीं हीं होत. हीं नवलाचीं लेणीं विनाप्रयासानें दोन दिवसांच्या अवधींत पहातां येतात. त्याशिवाय औरंगाबाद शहराचें वैभवही डोळ्यांखालीं घालतां येतें.

या दोन दिवसांच्या कालांतरांत मुंबईहून येतां–जातां ७०० मैलांचा प्रवास रेल्वेमार्गानें होतो. आठवड्याच्या सरत्या दिवसांत प्रवास करणें झाल्यास शुक्रवारीं सायंकाळीं मुंबईहून निघून सोमवारीं सकाळीं कामावर हजर होतां येतें.

शनिवारीं पहाटेस जळगांव गाठतां येतें. येथें दळणवळण खात्याच्या प्रवासी विभागाकडून महाराष्ट्र राज्यासाठीं एक इमारत बांधण्यांत येत आहे व ती प्रवाश्यांच्या सोयीसाठीं खुली ठेवण्यांत येणार आहे.

जळगांव मुक्कामीं प्रातर्विधी आटोपून व न्याहारी करून दोन तासाच्या आंत आपणांला अजण्टा गाठतां येतें. जळगांवहून अजण्टा फक्त ३७ मैलांवर आहे. हा प्रवास सखल प्रदेशांतून करावा लागतो.

बस किंवा मोटर गाडी आपल्याला अजण्टाच्या पायथ्याशीं सोडते. टेकडीच्या शिखरावर पोहोंचण्याला १०० पायऱ्या चढाव्या लागतात. या ठिकाणाहून आपल्याला बुद्धांनीं कोरलेल्या लेण्यांचें प्रथम दर्शन होतें. नितळ कातळांत हीं लेणीं कोरण्यांत

आलीं आहेत. या ठिकाणीं जातांच तुम्हांला बहुदा बौद्ध भिक्षूंचा ताफा दृष्टीस पडेल. आपल्या पूर्वजांनीं कोरलेल्या लेण्या पहाण्यासाठीं ते येत असतात. त्यांनीं पिवळ्या धमक कफन्या घातलेल्या असतात. स्थानसौंदर्याच्या पार्श्वभूमीवर ते खुलून दिसतात.

खिस्तशकापूर्वी २०० वर्षांपासून तों इ. स. ८०० पर्यंतच्या एक हजार वर्षांच्या कालांतरांत हीं अजण्ठा लेणीं व त्यांतील कोरीव काम हातावेगळें करण्यांत आलें. अजण्ठाचीं कोरीव लेणीं वेरूळपेक्षां पुराणीं होत. कारण वेरूळ येथील कोरीव काम इ. स. ६०० पासून सुरूं झालें.

अजण्ठाचीं कोरीव लेणीं जवळ जवळ १० शतकें मानवीदृष्टीच्या आड होतीं. बुद्धधर्माच्या ऱ्हासानंतर ह्या लेणींचें महत्त्व संपुष्टांत आलें व त्यांचा सर्वांना विसर पडला.

इ. स. १८१९ मध्यें कांहीं ब्रिटीश सैनिक, भोंवतालच्या टेकड्यांतून लष्करी हालचाली करत असतां त्यांना उंचावरून, रानवट झाडाझुडपांच्या पलीकडे दगडांत कोरलेला हत्ती पाहिल्याचा भास झाला. सर्व अडगळ साफ करून ते त्या उतरणीवरून खालीं उतरले आणि त्यांनीं जगांतील एका अमूल्य ठेवीचा अशा रीतीनें शोध लावला.

एकामागून एक अशा २९ गुंफांचा शोध लागला. त्या सुरक्षित पद्धतीनें राखण्यांत आल्या होत्या. त्यांतील चित्रांच्या प्रतिकृत्या काढण्यांत आल्या व शेवटच्या गुंफेचें चित्र पुरें झाल्यानंतर त्या लंडनमधील क्रिस्टल प्लेसच्या संग्रहालयांत पाठविण्यांत आल्या. त्यानंतर त्या संग्रहालयाला आग लागली व त्या आगींत हा चित्रसंग्रह भस्मसात झाला. त्यानंतरहि कांहीं प्रतिकृत्या रंगविण्यांत आल्या होत्या.

बहुधा प्रत्येक कोरींव कामांत एखादी कथा निगडित झालेली आहे. या लेणींतील गीतचित्रांचें वैशिष्ट्य हें कीं, त्या वेळच्या अपरिपक्व ज्ञानाच्या पाठिंब्यावर जरी ही रंगसंगती साधण्यांत आली असली तरी ती प्रदीर्घकाळ टिकून राहिली आहे.

त्याशिवाय फक्त हातोडा व दगड फोडण्याची छनी याच साधनांनीं अजण्टा व वेरूळ येथील लेणीं कोरण्यांत आलीं आहेत. कारण त्या काळीं दुसरीं कोणतींच आयुधें उपलब्ध नव्हतीं.

बहुतेक गुफांमध्यें एक एक मंदीर असून त्यांत गौतमबुद्धाची मूर्ती बसविण्यांत आली आहे. "एवढ्या लहान प्रवेशद्वारांतून दगडाची एवढी प्रचंड मूर्ती कशी आणतां आलीं?" असा प्रश्न एका युरोपियन प्रवाश्यानें विचारल्यावरून त्याला सांगण्यांत आलें कीं हीं शिल्पें बाहेरून आणण्यांत आलीं नसून तीं आंतल्या आंत कातळावर कोरण्यांत आली आहेत.

दुसरा एक नेहमींचा प्रश्न विचारण्यांत येतो तो हा कीं, बुद्धतत्त्वें तपाचरणी असतांना स्त्रियांच्या शिल्पाचा व चित्रांचा भरणा ह्या कोरीव लेणींत कां असावा ? या प्रश्नाला उत्तर असें कीं, बुद्धधर्माची दीक्षा घेऊं इच्छिणाऱ्यांच्या ईश्वरभक्तीची पारख करण्यासाठीं व ऐहिक भुरळीपासून ते अलिप्त राहूं शकतात कीं कसें हें पाहाण्यासाठीं स्त्रियांच्या शिल्पांचा व चित्रांचा भरणा करण्यांत आला आहे.

सर्वच गुंफा बारकाईनें पहाण्याची आवश्यकता नाहीं. त्यांतील कांहीं गुंफा अपूर्ण आहेत. या कार्यासाठीं उत्स्फूर्त दान देणाऱ्यांकडील धनसंचय संपला असावा. १, २, ४, १०, १६ आणि २० ते २६ क्रमांकांच्या गुंफा बारकाईनें व विविधपणें पाहिल्या पाहिजेत.

टेकडीच्या माथ्यावरील एका विवक्षित ठिकाणावरून गुंफेंतील कोरीव काम नालाकृती दिसतें. येथें रहाण्यासाठीं बंगला किंवा घर नाहीं. गार पाण्याच्या जलसंचयापाशीं एक गुहा आहे. या गुहेंत दुपारचें जेवण वगैरे करून आरामशीर विश्रांती घेतां येते. रात्रौ मुक्काम करणाऱ्यांसाठीं अजण्ठापासून सात मैलांवर फर्दापूर मुक्कामीं एक सुंदर बंगला आहे. या कोरीव लेणींच्या पायथ्याशीं विश्रामधाम व उपहारगृह बांधण्यांत येत आहे.

१८

○

○

# औ रं गा बा द

○

○

○ ○ ○ ○ ○ ○ ○ ○

अजण्ठाहून दोन प्रहरीं ३ वाजतां निघाल्यास मोटरनें ६६ मैलांच्या प्रवासानंतर औरंगाबाद गाठतां येतें. औरंगाबादेला एक खाणावळ व वसतिगृह असून प्रवाश्यांच्या सोयीस्तव बंगलेही भाड्यानें मिळूं शकतात.

औरंगाबादेला पहाण्यासारखीं अनेक ठिकाणें आहेत; त्याशिवाय जवळच सुप्रसिद्ध वेरूळचीं कोरीव लेणीं आहेत. रेल्वेस्टेशनच्या जवळ एक विभागीय कचेरी असून त्या कचेरीकडून प्रवश्यांची सोय पहाण्यांत येते.

औरंगाबादेंतील पहिलें आकर्षण जर कोणतें असेल तर तें बिब्बी–का–मकबरा हें होय. ज्यांनीं ताजमहालचें प्रत्यक्ष दर्शन घेतलें नसेल आणि तो नुसत्या चित्रांतून पाहिला असेल त्यांनीं मकबरा पहातांच, त्यांच्या मनावर परिणाम झाल्याशिवाय रहाणार नाहीं. ज्यांनीं ताजमहालचें दर्शन घेतलें असेल, त्यांना मात्र मकबरा व ताजमहाल यांमधील फरक जाणवेल, हें नैसर्गिक होय. मकबरा उभा करण्याला साडेसहा लाख रुपये लागले तर आग्र्याच्या ताजमहालपायीं बारा कोटी रुपये खर्ची पडले.

मकबराच्या रेखाटणींत ताजमहालपेक्षां कांहीं विशेष कौशल्य वापरण्यांत आलें आहे असें हमखासपणें सांगण्यांत येतें. उदाहरणार्थ, मनोऱ्यांची बांधणी अशा पद्धतीची आहे कीं तेथील चारी मनोरे कोणत्याही कोपऱ्यावरून दिसूं शकतात.

औरंगजेबाची सहचारिणी राबिया दौराणी हिच्या स्मरणार्थ हा मकबरा बांधण्यांत आला व तो ताजमहालनंतर तीस वर्षांनीं पुरा झाला. हा मकबारा स्वतः औरंगजेबानें

बांधला किंवा तो बांधला जात असतां त्यावर त्यानें वैयक्तिक देखरेख केली असा जो समज आहे तो चुकीचा आहे. औरंगजेबाचा पुत्र आझम शहा यानें आपल्या आईच्या स्मरणार्थ हा मकबरा बांधला.

कारंजाच्या बाजूच्या चिरेबंदी रस्त्यावरून चालल्यानंतर स्मारकाच्या सान्निध्यांत जातां येतें. हें स्मारक ताजप्रमाणें स्फटिकाच्या चौथऱ्यावर उभें आहे. प्रवेशद्वारावरील कोरीव काम बहारीचें आहे. एका चिमुकल्या दरवाज्यांतून आंत गेल्यानंतर एक गॅलरी लागते व तेथून खालीं राणीचें थडगें दृष्टीस पडतें.

त्याची बांधणी अशा पद्धतीची आहे कीं, मुसलमानी धर्मानुरूप त्यावर पावसाचे थेंब व सूर्यकिरण पडावेत, त्याचप्रमाणें वाऱ्याची झुळूक खेळती राहून इतर पंचमहाभूतांचें सान्निध्य असावें.

आम्ही, त्यानंतर स्फटिकाच्या दादरानें थडग्यांत प्रवेश केला व जवळून तें थडगें बारकाईनें पाहिलें. थडग्याच्या भोंवतीं स्फटिकाचा पडदा विशिष्ट पद्धतीनें कोरण्यांत आला आहे.

हिरव्या कपड्यांत गुंडाळलेल्या, एका बाजूला अनेक बांगड्या आणि कापडाचे तुकडे होते. हें थडगें महिलेचें आहे हें दाखविण्यासाठीं भक्तांनीं अर्पण केलेल्या त्या वस्तु होत्या.

मकबऱ्याचा घुमट जवळून पाहाण्याच्या इच्छेनें मी एका मनोऱ्यावर, शंभर फूट उंचीवर चढून गेलों. हा घुमट ताजमहालच्या घुमटाहून लहान असून बाजूंनीं कमी फुगीर आहे असें मला स्मरतें.

बाहेरच्या प्रचंड दरवाज्यावर शिल्पकाराचें नांव आणि मकबरा उभारल्याचा दिनांक वगैरे, कोरण्यांत आलें आहे.

येथून निघाल्यानंतर अवघ्या दहा मिनिटांच्या आंत पाणचक्कीला पोहोचतां येतें. हें एक रमणीय स्थान आहे. नजीकच औरंगजेबाचा गुरू रेबांशाह मुझाफीर या खिस्तीचें थडगें आहे. या पाणचक्कीवर पूर्वी धान्य दळलें जाई असें सांगतात. ही यंत्रणा पाहण्यास विसरूं नका. ह्या प्रदेशांतील हे स्थान अत्यंत रमणीय असल्याची बोलबाला आहे; आणि त्याबद्दल आश्चर्य करण्याचे कांहीं कारण नाहीं कारण ती सार्थ आहे.

येथील थंडगार जलाशयाजवळ किंवा एकाद्या कुजांत विश्रांति घेतां येतें. जलाशयाच्या खालीं एक विस्तृत दिवाणखाना आहे. विद्यार्थ्यांना शांतपणें अभ्यास करण्यासाठीं तो बांधण्यांत आला असावा.

रेबांशाह मुझाफीरच्या थडग्यानजीकच एक पुस्तकालय असून सायंकाळीं कांहीं नागरिक एकादा दुसरा तास घालविण्यास तेथें येतात.

* * *

वेरूळचीं कोरीव लेणीं जवळच असल्यानें औरंगाबाद येथील लेणींच्या बाब-तींत दुर्लक्ष झालें. प्रवाश्यांच्या हातून ह्या लेणींची विल्हेवाट लागली आहे. पण तेथील शिल्पकाम व कोरीव काम स्वयंमन्य, आश्चर्यकारकच आहे. ह्या एकंदर ९ गुहा आहेत. त्या अजण्ठाएवढ्याच पुराण्या आहेत व वेरूळपेक्षां अधिक पुराण्या आहेत व त्यांचें सौंदर्यही अनुपम आहे. शहरापासून एका मैलावर मकबऱ्याजवळच हीं लेणीं आहेत.

वेरूळचीं लेणीं औरंगाबादहून १२ मैलांवर आहेत. रस्ता चांगल्या प्रतीचा आहे. वेरूळच्या अलिकडे दोन मैलांवर, खुल्दाबादजवळील औरंगजेबाचें थडगें पहाण्यालायक आहे.

जगांतील कोणत्याही बादशहाच्या थडग्यापेक्षां हें थडगें अत्यंत साधें आहे, हें ह्या थडग्याचें वैशिष्ट्य होय. औरंगजेब हा इस्लामी धर्माचा कट्टर अनुयायी होता. त्याची सक्त अनुज्ञा होती कीं, आपल्या कबरेवर बाह्यात्कारी डामडौल कोणताही नसावा. आपली कबर उघड्या आकाशाखालीं असावी आणि आपली अखेरची निद्रा घेण्याचें स्थान म्हणून त्या ठिकाणीं एक वरंबा किंवा चिमुकला उंचवटा असावा.

त्यानें आपल्या मृत्युपत्रांत लिहिलें होतें कीं, आपण स्वतः शिवलेल्या टोप्या विकून जे पैसे गोळा होतील, तेवढ्याच पैशांत आपलें क्रियाकर्मांतर करावें. सदर टोप्या विकून एकंदर दहा रुपये जमा झाले होते. कालपरवांपर्यंत औरंगजेबाच्या थडग्या-भोंवती जाळी देखील नव्हती. तें उघड्यावर पडलें होतें.

१९

०

०

# वेरूळचीं लेणीं

०

०

० ० ० ० ० ० ० ०

खुल्दाबादच्या औरंगजेबाच्या थडग्यापासून दोन मैलांवर जातांच वेरूळच्या प्रचंड कोरीव लेणींचें दर्शन होतें. तीं जगप्रसिद्ध लेणीं हमरस्त्यावरच आहेत. अजण्ठाप्रमाणें आडवळणानें जावें लागत नाहीं. अजण्ठाप्रमाणें त्यांचा शोध लावावा लागला नाहीं, कारण, त्या कधीं दृष्टीआड झाल्याच नव्हत्या. अजण्ठाप्रमाणें त्या संकेतगर्भित नाहींत. अधूनमधून साधनसुचितेला धरूनही नाहींत. साधनसुचितेला चिकटून असणें हें अजण्ठाचें वैशिष्ट्य होय.

वेरूळचीं लेणीं अजण्ठाएवढीं पुराणीं नाहींत. त्यांची उभारणी इ. स. ३०० मध्यें सुरू झाली व इ. स. १३०० मध्यें पुरी झाली. याविरुद्ध अजण्ठाचें शिल्पकाम इसवी सनापूर्वी २०० वर्षें सुरू झालें व इ. स. ८०० मध्यें पुरें झालें. दोन्ही कोरीव लेणीं पुरीं होण्याला जवळ जवळ १,००० वर्षें लागलीं असें दिसून येतें.

वेरूळच्या कोरीव लेणींची तीन वर्गांत विभागणी करण्यांत आली आहे. बौद्ध-धर्मीय, हिंदुधर्मीय व जैनधर्मीय असे तीन वर्ग करण्यांत आले आहेत. अजण्ठा फक्त बौद्धधर्मीय आहेत यामुळे बौद्धधर्माचा ऱ्हास होतांच हीं कोरीव लेणींही दृष्टिआड झालीं व कित्येक पिढ्यांना त्यांचा विसर पडला.

पण वेरूळचीं लेणीं स्वतःचें, स्मृतींतील व दृष्टींतील अस्तित्व, संभाळून राहिलीं; कारण एका धर्माचा ऱ्हास झाला तरी दुसरा धर्म उर्जितावस्थेंतच राहिला

होता. त्याशिवाय वेरूळचीं कोरीव लेणीं बांधणाऱ्यांची धार्मिक दृष्टि होती, धर्मप्रसार करण्याचें त्यांचें उद्दिष्ट होतें व त्यांनीं हमरस्त्यावर जी जागा मुक्रर केली त्यावरून त्यांच्या या ध्येयाची साक्ष पटते. अजण्ठा बांधणाऱ्यांना एकांत हवा होता.

अजण्ठाचीं कोरीव लेणीं शेकडों वर्षें दृष्टिआड राहिल्यानें तुलनात्मक दृष्टीनें तीं सुरक्षित आहेत पण वेरूळच्या लेण्यांची, त्या सतत उपयोगांत असल्यानें नासधूस झाली आहे. वेरूळला ओल्या गिलाव्यावर सुरवातीलाच काढलेल्या असंख्य आकृत्या व चित्रें होतीं, परंतु कालांतरानें व हवेंत उघड्यावर पडल्यामुळें तीं नष्ट झालीं आहेत.

वेरूळ येथील कोरीव लेणीपैकीं १३ लेणीं बौद्धधर्मियांचीं आहेत, १६ हिंदूंचीं आहेत व ५ जैनांचीं आहेत; अशा एकंदर ३४ गुंफा आहेत.


बुद्धधर्मीय लेणी क्रमांक १० पासून आपल्या निरीक्षणास सुरुवात करा. कारण या सर्व गुंफांमध्यें चैत्य गुंफा किंवा प्रार्थनामंदीर असें हें एकच आहे. ह्या गुंफेला विश्वकर्मा किंवा सुताराची गुंफा म्हणतात.

बौद्धधर्मियांच्या प्रार्थनामंदीर बांधकामाच्या पद्धतीचा व संस्कृतीचा, ही गुंफा एक सर्वोत्कृष्ट नमुना आहे असें मानलें जातें.

हें पुराणें, इ. स. ७०० चें बांधकाम असून, स्तूपावरील बुद्धांच्या शिल्पकलेचें सर्वांत प्रचंड कार्य आणि महायान प्रार्थनामंदिराचा उत्कृष्ट नमुना म्हणून गणलें जातें. कार्ला येथील चैत्य गुंफेशीं त्या गुंफेचें सादृश्य आहे असें मला उमगलें, मात्र ही तितकी मोठी नाहीं किंवा हिचें छतही लाकडाचें नाहीं.

त्याचें प्रवेशद्वार भव्य, विशाल व शोभिवंत असून सज्जा नालाकृति, कंगोऱ्याच्या खिडक्यांनीं युक्त असून त्यावर कलापूर्ण अशीं असंख्य कोरीव कामें खोदलेलीं आहेत. वेरूळचीं लेणीं उतरत्या कातळावर कोरलेलीं असल्यानें प्रत्येक गुंफेला एक अंगण आहे. अजण्ठामध्यें अशीं अंगणें दिसत नाहींत, कारण तीं लेणी उभ्या सुळक्यावर कोरण्यांत आलीं आहेत.

बहुधा प्रत्येक गुंफेच्या पाठीशीं एक कथा आहे. त्या सर्व कथा या ठिकाणीं सांगत बसणें अशक्यप्राय आहे. इतकेंच सांगितलें म्हणजे पुरें कीं, दुसरी महत्त्वाची अशी बुद्धधर्मियांची गुंफा, क्रमांक ५ ही होय. ही सर्वांत उंच एकमजली विहार गुंफा. ह्या गुंफेचा दिवाणखाना ११७ फूट खोलवर आंत आहे आणि त्या ठिकाणीं तऱ्हतऱ्हेचें शिल्पकाम कोरण्यांत आलें आहे. १२ क्रमांकाच्या गुंफेला तीन थाळ म्हणतात. याचा अर्थ असा कीं ही गुंफा तीन मजली आहे. भारतांतील ही सर्वांत मोठी तीनमजली विहार गुंफा होय आणि त्यांतील स्तूप एकसारखे व व्यवस्थितपणें कोरलेले आहेत. एका दालनांत गौतम बुद्धाची मूर्ती असून, तिजकडे पाहिलें असतां ते प्राणायाम करीत असल्याचा भास होतो.



वेरूळचें कैलास मंदिर

पहा, एकामागून एक गुंफा पहा आणि त्यांच्या सौंदर्याचें, सुबकतेचें, कलेचें व महत्त्वाचें कौतुक करा !

बौद्धधर्मियांच्या गुंफा पाहिल्यानंतर हिंदूंच्या गुंफा लागतात. या गुंफांतील आश्चर्यांतील आश्चर्य म्हणजे कैलासमंदिर (गुंफा क्रमांक १६)! १४ व १५ क्रमांकांच्या गुंफांमध्यें गौतमबुद्धांच्या निरनिराळ्या मनोवस्था दाखविण्यांत आल्या असून, त्यावरून भविष्यकाळाचे भाकीतकथनाचा प्रयत्न करण्यांत आल्याचें दृष्य दिसतें.

पण कैलासमंदिराचें दर्शन घेत असतां तेथील भव्य व प्रचंड कल्पकता पाहून तुम्ही स्तिमित होतां. ह्या मंदिराची सुरवात इ. स. ७२५ मध्यें झाली व तें पुरें होण्याला तीसपासून शंभर वर्षें लागलीं असावींत असा कयास बांधण्यांत येतो.

असें म्हणतात कीं ह्या लेण्याचें कोरीव काम करण्याला २,००,००० टन कातळ खोदावा लागला. त्याची पार्श्व भिंत नितळ खडकाची असून ती १०० फूट उंच आहे.

आंत शिरतांच दोन्ही बाजूंना उभे असलेले प्रचंड खांब आपल्या दृष्टीस पडतात. त्यानंतर जणूं काय हत्तींच्या, सिंहांच्या व इतर नरभक्षकांच्या खांद्यांवर उभें असलेलें विशाल मंदिर, नंतर शिल्पकलेनें भरलेले भोंवतालचे सज्जे, मंदिराचा गाभारा, तऱ्हेतऱ्हेच्या ओवऱ्या, देवळाच्या दोन्ही बाजूंला रामायण–भारतांतील कोरलेल्या कथा–हें सर्व अवलोकन करत असतां पहाणारा मंत्रमुग्ध होतो.

हें कैलासमंदिर बारकाईनें पाहूं गेल्यास कितीतरी दिवस लागतील. कारागिरांनीं केवळ हातोडी व छनीच्या सहाय्यानें हा दगडांतील चमत्कार कसा घडवून आणला असेल यासंबंधीं विचार करणेंही अशक्य होतें.

कैलास पाहिल्यानंतर आपण खुल्दाबादच्या विश्रामधामांत जावें असें मी सुचवितों; कारण त्या ठिकाणीं विश्रांती घेण्यास व विचार करण्यास आपणाला भरपूर अवकाश मिळेल.

खुल्दाबादचें हें विश्रामधाम सर्वांगसुंदर आहे; तें एका कड्यावर बांधण्यांत आलें असून खालीं खोल व विस्तृत दरी आहे. तेथील व्यवस्था चोखंदळ रीतीनें ठेवण्यांत आली आहे. बसण्याउठण्याची उत्कृष्ट सोय आहे. येथें सहा–सात खोल्या असून पांथस्थगृह लागूनच आहे; या ठिकाणीं एक–दोन दिवस मौजेंत राहतां येतें. दरदिवशीं खोलीमागें ५ रुपये भाडें आकारण्यांत येतें. येथें जरूर वाटल्यास भोजनाचीहि सोय होऊं शकते. ह्या विश्रामधामापासून एक सिमेंटचा चिंचोळा रस्ता कैलासमंदिरापर्यंत बांधण्यांत आला आहे. ह्या रस्त्यानें आपल्याला आडवळणांच्या नादीं न लागतां जवळच्या जवळ द्रुतगतीनें कैलासमंदिर गाठतां येतें.

दोन प्रहरचें जेवण आटोपल्यानंतर, कोरीव लेणींचें निरीक्षण करण्यास परत जा व गुंफा क्रमांक २९ पहा. येथील लेणें पाहून आपल्याला अपोलो बंदराच्या दर्यापार असलेल्या घारापुरी लेणीचें स्मरण होईल. त्यानंतर शिल्लक राहिलेल्या वेरूळ येथील जैन गुंफांचें अवलोकन करा.

आम्हांला असें विषद करण्यांत आलें कीं, लेणींचें कोरीव काम जसजसें अधिकाधिक कालांतरानें करण्यांत आलें तसतशी त्यांतील कला भ्रष्ट झाली, सुबकता नष्ट झाली आणि त्यांतील आकृत्यांमधील समतोलपणा व कलानैपुण्य अदृश्य झालें; यावरून असें अनुमान निघूं शकतें कीं ही नंतरची कलाकृति हलक्या प्रतीच्या कलाकारांनीं केली असून पूर्वकालीन कलावंतांचें बुद्धिचातुर्य नष्टप्राय होत चाललें आहे.

२०

# किल्ले दौलताबाद

इतक्या दूर औरंगाबादला येऊन दौलताबादचा प्रचंड किल्ला पाहावयाचा नाहीं असं कधीं झालंय? वेरूळहून परत येतांना किल्ले दौलताबाद पहाणें सोयीचें असतें.

किल्ल्यावर चढायला अर्धातास लागतो. या किल्ल्याची उंची ५०० फूटांची आहे. चालत जातांना एका मैलाचें अंतर कापावें लागतें. जातांना भुयारांतून जावें लागतें आणि अंधारांतून जातांना मशाली पेटवाव्या लागतात, हें किल्ला चढण्याच्या मौजें-तील वैशिष्ट्य होय.

या किल्ल्याचें पुरातन नांव देवगिरी होतें. त्याच्या भोंवती भला मोठा खंदक आहे. त्यामुळें हातघाईच्या लढाया झालेल्याचा किंवा किल्ल्यावर प्रत्यक्ष हल्ला करण्याचे प्रयत्न झाल्याचा पुरावा सापडत नाहीं. १२९३ सालीं अल्लाउद्दीन यानें या किल्ल्याभोंवती वेढा घातला होता त्या वेळीं त्यानें सर्व शहर काबीज केलें पण त्याला किल्ला घेतां आला नाहीं.

यादव राजांच्या हातीं हा किल्ला होता आणि इ. स. १३३८ सालीं महंमदशहा तघलकनें त्यांची ससेहोलपट करून किल्ल्याची डागडुजी केली व त्याचें नांव दौलताबाद ठेवलें.

दौलताबादला चांदमिनार किंवा जयस्तंभ, प्रवाश्यांचें आदरातिथ्य करण्यास अष्टौप्रहर उभा आहे. किल्ल्यांत प्रवेश करतांच चांदमिनारचें दर्शन होतें. तो १४३५ सालीं बांधण्यांत आला असून त्याची उंची १०० फूट आहे.

किल्ल्याची हद्द ओलांडण्यासाठीं, पोलादी पुलावरून जावें लागतें ; हा पूल पूर्वी दगडी होता. किल्ल्यावरून दिसणारा देखावा नयनमनोहर आहे. किल्ल्यावर एक मोठी तोफ असून त्यावर गुजराथी लिपींत लिहिलेला मजकूर आहे. त्यांत वाणी लोकांनीं दिलेल्या वित्तदानाचा उल्लेख आहे. त्या तोफेवर दुसरा एक आलेख आहे. त्यावरून त्या तोफेचें नांव " तुफान निर्माण करणारी तोफ " असें आहे, असा निष्कर्ष निघतो.

२१

# किल्ले शिवनेरी

पुण्यापासून ५६ मैलांवर हमरस्त्यावर ऐतिहासिक महत्त्वाचें जुन्नर शहर वसलें आहे. जुन्नरची लोकसंख्या १२,००० असून तेथें १७ सदस्यांची एक नगरपालिका आहे. जुन्नर येथील डोंगरांतून १३५ गुहा आहेत. वर्षांतील बारामास, येथील हवामान थंड व आरोग्यदायक असतें आणि सर्व सुखसोयी व सौंदर्यावरील मुगुटमणी म्हटला म्हणजे किल्ले शिवनेरी हा होय! हा किल्ला शहरापासून १,००० फूट उंचीवर आहे आणि जुन्नर शहर समुद्रसपाटीपासून २,००० फूट उंचीवर आहे.

पुण्याहून जुन्नरच्या रस्त्यावर चाकणचा किल्ला लागतो व तो चाकण शहरांतच बांधण्यांत आला आहे. चाकण पुण्याहून सारें १९ मैलांवर आहे.

जुन्नरमधील लोकसंख्या हिंदु व मुसलमान अशा मिश्र समाजाची आहे. हे दोन्ही समाज पिढ्यान् पिढ्या गुण्यागोविंदानें रहात असतात. बौद्ध कालखंडापासून येथील गुंफा व मंदिरें प्रस्थापित झालीं असल्यानें, येथील मानवी अवस्थेला पुराण्या संस्कृतीचा स्पर्श झाल्यागत दिसून येतें.

मुसलमानी हुकमतींतील व कालखंडांतील कांहीं स्मृतिचिन्हें या ठिकाणीं अजून दृष्टीस पडतात व त्यापैकीं शिवनेरीचा किल्ला हें एक स्मृतिचिन्ह होय. याच किल्ल्यावर श्रीछत्रपति शिवाजीमहाराजांचा जन्म इ. स. १६३० मध्यें झाला.

सत्तेच्या शिखरावर असतांना, शिवनेरी किल्ला हस्तगत करण्यासाठीं, श्रीछत्रपति शिवाजीमहाराजांनीं एकाहून अधिक प्रयत्न केले. परंतु किल्ल्यांतील शिबंदीनें पराक्रमाची

परिसीमा गाठली आणि महाराजांना गोंधळवून टाकलें; अखेरीस महाराजांना किल्ला घेतां आला नाहीं व परत फिरावें लागलें!

पण इतिहासाचा चंचलपणा कसा असतो, तें पहा. शिवाजीमहाराजांच्या अवसानानंतर शिवनेरीचा किल्ला मराठ्यांच्या हातीं पडला. या सर्वश्रेष्ठ नेत्यानें आपल्या जन्मस्थानाचा अभिलाष धरला होता परंतु त्याला तो पुरा करतां आला नाहीं.

किल्ल्याचा पायथा, जुन्नर शहरापासून एक मैलाच्या आंतच आहे. एका अगडबंब खडकावर शिवनेरी किल्ला उभा आहे. त्याचें नयनरम्य दर्शन 'पहिल्यानें होतें. किल्ल्याच्या भोंवती ३० फूट उंचीचा सरसकट कडा किंवा घाट आहे. ह्या कातळांत बुद्धांच्या गुंफा सर्वत्र कोरलेल्या आहेत; हीं लेणीं अत्यंत कौशल्यानें, शिल्पकलेशीं प्रामाणिक राहून व प्राणपणाला लावून कोरण्यांत आलीं आहेत. धर्मनिष्ठेनें केलेली ही कलाकृती मानवी परिश्रमाच्या व मानवी कल्पनेच्या पलीकडची आहे.

डोंगराच्या मध्यंतरीं, जवळ जवळ अधांतरीं कोरीव लेणीं कोरण्यांत आलीं आहेत असा हा पहिलाच पहाड. डोईवर किल्ला आणि धार्मिक ध्यानमननासाठीं व मनाच्या शांतीसाठीं कोरण्यांत आलेल्या अशा गुंफा इतरत्र मिळणें शक्य नाहीं. कालांतरानें ह्याच गुंफांचा विनियोग तुफानी सैनिकी हालचालीसाठीं करण्यांत आला.

इ. स. १०० पासून इ. स. ३०० पर्यंत शिवनेरीचा पहाड, हा बुद्धधर्माचें केंद्र होतें. मला अशा पन्नास तरी गुहा व गुंफा दिसल्या. त्या प्रचंड पहाडावर या गुहा ठिपक्यासारख्या दिसतात. त्यांतील बहुसंख्य, पूर्व दिशेला आहेत व शहराकडून शिवनेरी डोंगराकडे जाण्याचा तोच मार्ग आहे.

किल्ल्यांत जाण्यासाठीं सात दरवाज्याचें होते. पहिल्या दरवाज्यावर आम्ही पोहोंचलों त्यावेळीं आम्ही ५०० फूट उंचीची घाटी चढलों होतों व जवळजवळ पाऊण मैलाचा रस्ता आम्ही पायाखालीं घातला होता. जसजसे आम्ही वर जात चाललों तसतसा खालील देखावा नयनमनोहर दिसूं लागला.

मोटरवाहनाचा रस्ता सरळ डोंगराच्या पायथ्याशीं जातो पण सध्यां जो रस्ता बांधण्यांत येत आहे; तो प्रवाश्याला पहिल्या दरवाज्याच्या जवळपास नेईल.

थोडीशी विश्रांति घेतल्यानंतर व इकडचा तिकडचा देखावा अवलोकन केल्या-नंतर आम्ही एका रुंद पायवाटेनें पुढें जाऊं लागलों. थोडीशी व अल्प परिश्रमाची चढण चढल्यानंतर, एकामागून एक दरवाजे लागतात व अखेरीस मुख्य दरवाज्याकडे आपण येतों. हा दरवाजा पुरातन व लाकडाचा असून तो प्रचंड आहे. ह्या दरवाज्याचे लोखंडी भाग थोडेसे गंजले आहेत पण प्रदीर्घ कालांतराच्या मानानें नासधूस कांहीं विशेष झालेली दिसत नाहीं.

कातळांत ज्या प्रशस्त व खोल पायऱ्या बनविल्या आहेत, त्या बौद्ध महंतांच्या पायऱ्यापेक्षां विस्तृत व मोठ्या आहेत. यावरून मुसलमानी अंमलाच्या पूर्वी हिंदू राजांकडून शिवनेरी डोंगराचा, किल्ल्याप्रमाणें उपयोग केला असावा असें दिसून येतें. हे बहुधा देवगिरी यादव असावेत व इ. स. ११७ पासून इ. स. १३३१ पर्यंत त्यांचा ताबा असावा. परंतु मुख्य दरवाज्यावरील शिल्पकला मुसलमानी अंमलांतील असावी.

लाकडी दरवाज्यांतून आम्ही किल्ल्याच्या सखल भागांत प्रवेश केला. या ठिकाणीं प्रथमतः आम्हाला कुतूहल उत्पन्न करणाऱ्या अशा टाक्या आम्ही अनेक पाहिल्या. त्या कातळामध्यें कोरलेल्या आहेत; त्या उघड्याच असतात. त्या बहुधा बौद्ध कालांत कोरलेल्या असाव्यात.

या टाक्या, डोंगरावर जिकडे तिकडे जाळ्याप्रमाणें पसरलेल्या आहेत. त्यांतील कांहीं टाक्यातील पाणी निर्मळ व थंडगार आहे व वर्षांत्त बारामास त्या तशाच तुडुंब भरलेल्या असतात. कांहीं टाक्या डोंगरामध्यें खालपर्यंत कोरलेल्या आहेत. प्रदीर्घ कालांतरानंतरही त्या पडधड न होतां त्याच परिस्थितींत आहेत यावरून त्या कोरणाऱ्या कलावंतांचें कौशल्य पाहून आम्ही दिङ्मूढ झालों.

पहिल्या दोन टाक्यांच्या पलीकडे, शिवाईचा दरवाजा असून त्याच्या आंत १०० पावलांवर शिवाईचें मंदिर आहे. बऱ्याचशा कारणांनीं तें मंदिर अद्वितीय आहे.

त्यांतील पहिलें कारण असें कीं, बौद्ध गुंफेच्या पोकळींत हें मंदिर बांधण्यांत आलें आहे आणि दुसरें असें कीं, श्रीशिवाजी महाराजांच्या मातोश्री जिजाबाई यांनीं शिवाईपाशीं पुत्रजन्मासाठीं नवस केला होता. शिवाई मातेनें हा नवस फेडला म्हणून जिजाबाई यांनीं कृतज्ञतापूर्वक मुलाचें नांव ‘शिवाजी’ ठेवलें.

ज्या सपाट भागांत हें देऊळ आहे, त्याला जोडून असलेल्या कड्यांत, बुद्धांच्या गुंफांच्या रांगा आहेत. या गुंफांत जातां येत नाहीं.

आम्ही परत शिवाईच्या मंदिरापाशीं आलों व नंतर उजवीकडील चढणीनें फाटक दरवाज्यापाशीं आलों. हा ६ वा किंवा शेवटच्या आधीचा दरवाजा. आम्हीं किल्ला चढणें तसेंच चालू ठेवलें व अखेरीस कुलपकार या शेवटच्या दरवाज्यांत आम्ही प्रवेश केला.

आंत येतांच, आम्हांला पहिली इमारत दिसली. तिला अम्बरखाना किंवा हत्तिखाना म्हणतात. ही इमारत व्यवस्थितपणें सुरक्षित दिसली. या इमारतींत सारख्या लांबीरुंदीचे विभाग पाडण्यांत आले होते व तिचा उपयोग हत्तीच्या तबेल्यासारखा करण्यांत येत असावा असें वाटतें.



श्रीशिवाजी महाराजांचें जन्मस्थान – शिवनेरीवरील नव्यानें बांधलेली वास्तु

आम्ही त्या त्रिकोणी टेकडीवर चढलों व आम्हांला मधोमध १०० फूट उंचीचा दुसरा डोंगरमाथा लागला. नजीक असलेल्या पाऊलवाटेवरून पुढें गेल्यानंतर आम्हांस सभोंवतालच्या डोंगरदऱ्यांचा नयनरम्य देखावा दिसला; याच ठिकाणावरून आम्हांला उपरिनिर्दिष्ट कौशल्यानें कोरलेल्या अनेक टाक्या दिसल्या. त्यांतील अत्यंत पुराण्या टाक्यांचीं नांवें, गंगा व यमुना हीं होत.

( या टाक्यांजवळून आम्हाला जिभेचा पाडा, हें स्थान पहिल्यानें दिसलें. ) टेकडींतून पुढें आलेला हा जिभेसारखा दिसणारा निमुळता खडक आहे. या खडकावरून महत्त्वाचीं अनेक ठिकाणें दिसतात, तीं ऐतिहासिक दृष्ट्या व पुराणकालांत झालेल्या झटापटींच्या दृष्टीनें पहाण्यालायक आहेत.

येथील एका चिमुकल्या घरांत, श्रीशिवाजीमहाराज जन्मले. हें घर नव्यानें बांधण्यांत आलें असून तें मोगली थाटाचें आहे. ही इमारत, एकमजली असून अरुंद प्रवेशस्थानीं शिवजन्माची माहिती कोरण्यांत आली आहे. जवळच पलीकडे, एक मोठा थोरला व कौशल्यानें कोरण्यांत आलेला हौद आहे.

जरा पुढें गेल्यानंतर कड्याच्या लगत, देहांतप्रायश्चित्त देण्याचें एक पडीक ठिकाण आहे. किल्ल्यावरील सत्ताधीश, या ठिकाणावरून गुन्हेगारांचा कडेलोट करीत असत.

हा कडा भव्य व भीतिदायक असला तरी येथून दिसणारें जुन्नर शहर, बौद्धधर्मियांच्या गुंफांनीं अलंकृत असणाऱ्या टेकड्या, वहात्या नद्या, नदीकिनाऱ्यांवरील देवळें आणि दूरवर दिसणारे बुरुज अत्यंत नयनमनोहर दिसतात.


श्रीशिवाजी महाराजांचा जन्म झाला, त्या इमारतीच्या भव्य दिवाणखान्यांत विश्रांती घेऊन व बरोबर आणलेल्या न्याहरीवर ताव मारून, आम्ही मशिदीची उडती कमान, या नांवानें प्रख्यात असलेलें स्थळ पहाण्यास निघालों.

वरील टेकडीच्या पायथ्याला म्हणजे जिभेच्या पाड्याच्या सुरवातीला ही मशीद आहे. ह्या मशिदीच्या दोन्ही बाजूंस, २० फूट उंचीचे व २४ फूट अंतरावर दोन मनोरे आहेत.

मशीद साधीच आहे, पण तिच्याखालीं एक कातळ कोरण्यांत आला असून त्यांत पाण्याचा हौद आहे व छप्पर खांबांच्या दोन रांगांवर आधारित आहे.

पाण्याचा हौद यादव राजांनीं बांधला, अशी आख्यायिका आहे. त्यानंतर मुसलमानांनीं त्यावर मशीद बांधली.

मशीद पाहिल्यानंतर आम्ही त्या डोंगरावरील अखेरचे १०० फूट चढलों. वर चढून जाण्याला आम्हांला १० मिनिटें लागलीं. त्या ठिकाणीं अनामिक असें एका



शिवनेरीवरील उडत्या कमानीची मशीद

मुसलमान बादशहाचें प्रचंड थडगें आहे आणि जवळच प्रार्थना करण्याची भिंत १८ फूट उंचीची आहे.

शिवनेरी किल्ल्यांतील हें अत्युच्च ठिकाण असून मी माझ्याजवळील उंची मोजण्याच्या यंत्राकडे पहातांच आम्ही १००० फूट वर आल्याचें मला समजलें. ही उंची चढण्याला आम्हांला २ मैल चालावें लागलें. या ठिकाणाहून दिसणारा आसपासचा देखावा मोहक आहे.

या ठिकाणीं बसलों असतां आम्ही ऐतिहासिक स्मृतिग्रंथाचीं पानें चाळलीं. येथील गुंफांच्या लांबलचक मालिकेवरून, जुन्नर हें बौद्धधर्मीय पीठाचें पूर्वकालापासून प्रमुख केंद्र होतें असें वाटतें. शिवनेरीवरील गुंफा, गणेशलेणें, मनमोडा, तुळजा हीं प्रतीकें शहरापासून एक-दोन मैलांवर असून प्रत्येकीं, ५० गुफांनीं युक्त अशीं हीं स्थानें आहेत. ह्या सर्व गुंफा पहाण्याचें ठरविल्यास दोन दिवसांचा कालावधी लागेल. त्यांतील कांहीं गुंफांतील कोरीव काम कलापूर्ण असून कांहीं गुंफा चित्रकलेनें भरलेल्या आहेत. मात्र कांहीं अगदींच साध्या आहेत.

पण प्रथमदर्शनी दिसणारा शिवनेरी किल्ला इ.- स. ११७० सालीं बांधण्यांत आला व तो त्यावेळीं देवगिरीच्या यादवांच्या ताब्यांत होता.

निजामशाही घराण्याचा प्रस्थापक मलीक अहमद यानें १४८५ सालीं जुन्नर येथें आपलें प्रमुख ठाणें ठेवलें होतें. त्यानें किल्ल्याचा ताबा मागितला असतां तेथील मराठा सेनापतीनें तो देण्याचें नाकारलें तेव्हां मलीकनें किल्ल्यावर हल्ला चढविला व दीर्घकालच्या वेढ्यानंतर, किल्ल्याचें रक्षण करणारे सैनिक मलीकला शरण आले. शरणागत सैनिकांनीं आपल्या मानेभोंवती तलवारी धरल्या होत्या व त्यांच्या अंगावरील कपड्यांच्या चिंध्या झाल्या होत्या.

किल्ल्यावरील महसूल मिळाल्यानें मलीक मातबर झाला. महाराष्ट्राचा पांच वर्षांचा महसूल, सदर किल्ल्यांत साठवण्यांत आला होता. त्यानंतर विजापूरच्या सुलतानांनीं शिवनेरी किल्ला मलीकच्या हातून घेण्याचे अनेक प्रयत्न केले, पण त्यांत त्यांना यश मिळालें नाहीं. इ. स. १४९४ सालीं मलीकनें आपल्या राजधानीसाठीं अहमदनगर वसविलें.

इ. स. १६०५ च्या सुमारास सुलतान २ रा मुर्तुजा निजाम यानें श्रीशिवाजी महाराजांचे पितामह म्हणजे आजोबा, मालोजीराव भोंसले यांच्या हुकमतीखालीं शिवनेरी किल्ला ठेवला. मालोजींचा हुद्दा, त्याचे पुत्र शहाजी राजे यांजकडे आला व त्यांची पत्नी जिजाबाईच्या पोटीं श्रीशिवाजीमहाराज जन्मले.

श्रीशिवाजी महाराजांच्या जन्मानंतर सहा वर्षांनीं, मोंगलाशीं झालेल्या तहानुसार ( ऑक्टोबर १६३६ ) शहाजीराजांनीं सात किल्ले मोंगलांस दिले, त्यांत शिवनेरी किल्ला होता. ते स्वतः मोंगलांचे त्यावेळचे दोस्त विजापुरचे अदिलशहा, यांच्या दरबारीं राहिले.

इ. स. १६५७ च्या मे महिन्यांत श्रीशिवाजीमहाराजांनीं जुन्नर लुटलें व त्यानंतर १६७० मध्यें त्यांनीं शिवनेरी किल्ला हस्तगत करण्याचा प्रयत्न केला. पांच वर्षांनीं महाराजांनीं पुन्हा प्रयत्न केला असें म्हणतात.

ह्या प्रकारानंतर पुरें एक शतक, किल्ल्याचा तावा मुसलमान व मराठ्यांमध्यें झुकत राहिला व अखेरीस इ. स. १८१८ मध्यें इंग्रजांनीं शिवनेरी किल्ला पेशव्यांकडून काबीज केला. आज शिवनेरी किल्ला महाराष्ट्राचें स्फूर्तिस्थान बनलें आहे. शिवभारताचे संस्थापक श्रीछत्रपती शिवाजीमहाराजांचें जन्मस्थान शिवनेरी किल्ला ! ह्या किल्ल्याचें पुण्यदर्शन घेण्यास महाराष्ट्र राज्यांतून वृद्धांच्या व तरुणांच्या झुंडीच्या झुंडी जात असतात. महाराज जन्मलेल्या खोलीला आज मंगल मंदिराचें स्वरूप प्राप्त झालें आहे.

## २२

# वज्रेश्वरी

वज्रेश्वरी येथील गरम पाण्याचे झरे इतिहासकालापासून प्रसिद्ध आहेत. वज्रेश्वरी हें ठिकाण मुंबईपासून अवघ्या ५० मैलांवर आहे. मुंबईहून वज्रेश्वरीला जाण्याकरतां तीन मार्ग आहेत. ( १ ) मुंबई ते वज्रेश्वरी भिवंडीमार्गें ५० मैल. ( २ ) मुंबई ते वसई ( पश्चिम रेल्वे ) व पुढें वसई ते वज्रेश्वरी मोटारीनें १७ मैल. ( ३ ) मुंबई ते ठाणें रेल्वेनें ( मध्य रेल्वे ) व पुढें ठाणें ते वज्रेश्वरी भिवंडीमार्गें मोटारीनें २८ मैल.

वज्रेवरीजवळ दोन गटानें गरम पाण्याचे झरे आहेत. एक गट आहे तेथून अर्ध्या मैलावर अक्रोळी येथें व दुसरा दोन मैलांवर गणेशपुरी येथें. सुट्टीच्या आणि यात्रेच्या दिवसांत हजारों लोक या ठिकाणाला भेट देतात. शिवरात्र, रंगपंचमी व चैत्री अमावस्येला हजारों यात्रेकरू या पवित्र ठिकाणाला भेट देऊन गरम पाण्याच्या कुंडांतून स्नान करतात आणि वज्रेश्वरीचें दर्शन घेतात.

तानसा नदीच्या पात्राजवळ वडवली गांवाजवळ सुमारें चार मैलांच्या परिसरांत हे गरम पाण्याचे झरे पसरले आहेत. ह्या झऱ्यांचें पाणी चांगलेंच गरम असून त्यांचे उष्णतामान १०० ते १४० अंशांपर्यंत असतें.

वज्रेश्वरी देवीनें या भागांत रहात असलेल्या असुरांचा संहार करून सुख व समृद्धि निर्माण केली म्हणून या देवीची मोठ्या भक्तिभावानें लोक पूजा करतात. सह्याद्रींतील गुमात्रा टेकडीवर वज्रेश्वरीचें देवालय बांधण्यांत आलें आहे. पेशव्यांचे सरदार श्री

शंकरजी केशव यांनीं अठराव्या शतकाच्या सुरुवातीला पोर्तुगीजांच्यावर मिळविलेल्या विजयाचें द्योतक म्हणून या मंदिराचा जिर्णोद्धार केला असें सांगतात. बडोद्याचे गायकवाड महाराज यांनीं या मंदिरापुढें लाकडी सभामंडप बांधला असून त्यांत कांहीं चित्रेंहि काढलेलीं आहेत. येथून जवळच असलेल्या अक्रोळी व गणेशपुरी येथेंहि प्राचीन मंदिरें आहेत.

येथें असलेल्या गरम पाण्यामुळें त्वचारोग व तसेंच मधुमेह, संधिवात वगैरे रोग बरे होतात असा प्रवाद आहे. भाविकांचें हें एक श्रद्धास्थान आहे. येथें राहणाऱ्या लोकांच्याकरतां अक्रोळीं येथें सहा आरोग्यधामें (सॅनिटोरियम्स्) आहेत. त्याशिवाय वरींच हॉटेल्सहीं आहेत. तसेंच " कुची विसा ओसवाल श्रीया साधक संघ " या संस्थेनें चालविलेले वेलजी देवन चेड्डा नांवाचें एक चांगलें आरोग्यधाम आहे. या ठिकाणीं बाहेरून येणाऱ्या लोकांना एका मोठ्या हॉलमध्यें जागा मिळूं शकते. येथें साधारणपणें हॉटेलमध्यें रहाण्याकरतां जेवणासहित दरमाणसीं रोजीं सुमारे पांच रुपये घेतात.

गणेशपुरी येथें राहण्याची व जेवणाची सोय चांगली आहे. येथें स्वामी नित्यानंदजी यांचा मठ असून त्यांची एक धर्मशाळाहि आहे. त्याशिवाय येथें खाजगी हॉटेल्स व घरेंहि आहेत. अलीकडे एक संस्कारकेंद्रहि येथें बांधण्यांत आलें आहे.

अक्रोळी येथें गरम पाण्याचीं एकूण सहा कुंडें आहेत. त्यांचीं नांवें पुढीलप्रमाणें आहेत:– सूर्यकुंड, चंद्रकुंड, ताराकुंड, मच्छिंद्र–गोरखकुंड, रामकुंड व सिताकुंड. यांपैकीं सर्वांत गरम पाणी सूर्यकुंडांत असतें व या कुंडामध्यें सुमारें तासीं १२०० गॅलनप्रमाणें गरम पाण्याचा प्रवाह चालू असतो. गणेशपुरी येथें भीमेश्वरकुंड, अनुसयाकुंड, अग्निकुंड व डॉ. कोठावाला कुंड अशीं चार कुंडें आहेत. यांपैकीं अतिशय गरम पाणी अग्निकुंडांत असतें व त्याचा ताशीं वेग सुमारें २८८० गॅलन असल्यामुळें त्याचा उपयोग स्नानासाठीं करतां येत नाहीं.

वज्रेश्वरी हें अतिशय रम्य ठिकाण आहे. या ठिकाणीं गेल्यानंतर तेथील शांत आणि प्रसन्न वातावरणामुळें श्रमपरिहार होण्यास मदत होते. महाराष्ट्र सरकार या ठिकाणीं लवकरच सुटींतील शिबिरांची सोय करणार आहे.

मूल्यवान
२०२१
२८८१२
३१।७।८८

२३

# पांचगणी

सातारा जिल्ह्यांत वाई ते महाबळेश्वर चढणीवर पांचगणी हें थंड हवेचें ठिकाण आहे. हें ठिकाण वाईपासून ११ मैलांवर, महाबळेश्वरपासून १२ मैलांवर व पुण्यापासून ६३ मैलांवर आहे. सह्याद्रीच्या डोंगरमाथ्यावरील थंड हवेच्या ठिकाणांपैकीं हें एक अतिशय लोकप्रिय ठिकाण आहे. याची उंची समुद्रसपाटीपासून ४३७८ फूट आहे.

महाबळेश्वरच्या परिसरांत अवघ्या बारा मैलांवर असूनहि येथें पाऊस बेताचा असतो व बाराहि महिने वातावरण आल्हाददायक असतें. येथून कृष्णाखोऱ्यांतील देखावा अतिशय आकर्षक दिसतो. येथील उंच सिल्व्हर ओकवृक्ष पाश्चात्य वनश्रीची आठवण करून देतात. येथें चांगल्या दर्जाच्या व विशेष शिक्षणाची वसतिगृहासह सोय असलेल्या ९ माध्यमिक शाळा आहेत. येथें बरींच आरोग्यधामें (सॅनिटोरियम्स्) त्याचप्रमाणें प्रवासी लोकांकरिता हिंदी आणि इंग्लिश पद्धतीचीं अनेक उपहारगृहे आहेत. महाराष्ट्र सरकारनें पांचगणी येथें अल्पवेतनी प्रवाशाकरतां सुटीच्या शिबिराची व्यवस्था केली आहे. या ठिकाणीं एका वेळीं ५ कुटुंबांची सोय होऊं शकते. येथील टेबल लॅण्ड नांवाचें विस्तीर्ण पठार व त्यावरून भोंवतालचा दिसणारा देखावा हें प्रवाशांचें विशेष आकर्षण आहे.

REFBK-0028818